बुधवार, १० मे २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२४३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • WEDNESDAY 10 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-243 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-10 • PRICE-5

# आफताबच श्रद्धाचा हत्यारा

## न्यायालयाने कलम ३०२ अंतर्गत हत्येचा गुन्हा केला निश्चित

आधुनिक केसरी न्यूज

**श्रद्धा वालकर हत्याकांड प्रकरणात आरोपी आफताब पूनावालाच्या विरोधात दिल्लीच्या साकेत न्यायालयाने भारतीय दंड संहिता कलम ३०२ अंतर्गत हत्येचा गुन्हा निश्चित केला आहे. तसेच कलम २०१ अंतर्गत गुन्ह्याचे पुरावे नष्ट करण्याचाही आरोप निश्चित केला आहे. आफताब पूनावालाने त्याची लिव्ह इन पार्टनर श्रद्धा वालकरची हत्या केली. त्यानंतर तिच्या मृतदेहाचे ३५ तुकडे केले. हे तुकडे त्याने दिल्लीच्या महारौलीच्या जंगलात आणि इतर भागांमध्ये फेकले होते. काही तुकडे त्याने ग्राईंडरमध्ये बारीक केले होते आणि हत्येचा पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याला नोव्हेंबर महिन्यात अटक करण्यात आली.**

दिल्लीतल्या साकेत न्यायालयाने आफताबवर आरोप निश्चित केले. आफताबच्या विरोधात हत्येचा आणि हत्या केल्यानंतर पुरावे नष्ट केल्याचा खटला चालणार आहे. अशात आफताबने हे आरोप फेटाळले आहेत आणि मी खटल्याला सामोरा जाईन असे म्हटले आहे. हे आरोप मला अमान्य आहेत असे आफताब पूनावालाने म्हटले आहे. न्यायालयाने श्रद्धाचे वडील विकास वालकर यांच्या एका याचिकेला ९ तारखेपर्यंत स्थगिती दिली होती. या याचिकेत विकास वालकर यांनी असे म्हटले होते की माझ्या मुलीच्या मृतदेहाचे अवशेष मला द्या मला त्यावर परंपरेप्रमाणे अंत्यसंस्कार करायचे आहेत. मात्र ९ मेपर्यंत या याचिकेला स्थगिती देण्यात आली आहे. आफताब पूनावालावर पोलिसांनी आयपीसी कलम ३०२ आणि कलम २०१ अंतर्गत आरोप निश्चित केले आहेत. आफताबने मागच्या वर्षी म्हणजे १८ मे २०२२ ला श्रद्धाची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर तिच्या मृतदेहाचे तुकडे केले. श्रद्धाच्या हत्येचे कारण काय? चार्जशीटमध्ये दिलेल्या माहितीनुसार १७ मे २०२२ ला श्रद्धा तिच्या एका मित्राला भेटण्यासाठी गुरुग्रामला गेली होती. १८ मे २०२२ च्या दुपारी ती परतली. श्रद्धा तिच्या दुसऱ्या मित्राच्या घरी राहिली म्हणून आफताब नाराज झाला होता. याच गोष्टीवरून दोघांमध्ये भांडण झाले. त्यानंतर आफताबने श्रद्धाची हत्या केली. या प्रकरणात आफताबला अटक करण्यात आली.



**१८ मे २०२२ ला काय घडले?** : १८ मे २०२२ ला श्रद्धा आणि आफताब या दोघांमध्ये मोठे भांडण झाले. त्यानंतर या दोघांचा आवाज वाढला त्यावेळी श्रद्धा जोरजोरात ओरडू लागली. त्यावेळी आफताबने तिचे तोंड दाबले आणि गळा आवळून तिची हत्या केली. तिची हत्या केल्यानंतर आफताबने तिचा मृतदेह बाथरूममध्ये ठेवला होता. हे भांडण का झाले होते त्याचे कारण अद्याप समोर आलेले नव्हते. जे पोलिसांनी कोर्टात दाखल केलेल्या चार्जशीटमुळे समोर आले आहे. श्रद्धाच्या मृतदेहाचे आफताब पूनावालाने ३५ तुकडे केले होते. ते तुकडे तो महारौली येथील जंगलात फेकत होता.



# इम्रान खान यांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना अटक करण्यात आली आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली त्यांनी इस्लामाबादमध्ये अटक करण्यात आली आहे. इस्लामाबाद न्यायालयाबाहेर इम्रान खान यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली इम्रान खान यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. दरम्यान अटकेच्या कारवाईनंतर इम्रान खान यांचे समर्थक चांगलेच आक्रमक झाले आहेत. पाकिस्तानमधील अनेक शहरात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इमरान खान यांना इस्लामाबाद कोर्टाच्या बाहेर अटक करण्यात आली आहे. पाकिस्तानी रेंजर्सने मंगळवारी त्यांना अटक केली आहे. इमरान खान यांच्या पक्षाचे नेते मुसर्रत चीमा यांनी ट्वीट करत अटक करणारे सुरक्षा अधिकारी यांनी इमरान खान यांना टॉर्चर करत असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच इमरान खान यांना मारहाण केल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. पीटीआयने जो व्हिडीओ ट्विट केला आहे की, त्यात इमरान खान यांचे वकील जखमी दिसत आहे. इमरान खान यांच्या अटकेनंतर इस्लामाबाद हायकोर्टाच्या मुख्य न्यायाधिशांनी नाराजी व्यक्त केली आहे. अटक करताना कोर्टाच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे. कोर्टात दाखल होण्याअगोदरच इमरान खान यांना अटक करण्यात आली आहे. मुख्य न्यायाधिशांनी 15 मिनिटक इस्लामाबादचे आयजी, गृहसचिव यांना तातडीने बोलवले आहे. जर 15 मिनिटात आयजी आणि गृहसचिव नाही आले तर मुख्यमंत्र्यांना उपस्थित राहणे बंधनकारक आहे. इमरान खान यांच्या वकिलांनी इमरान खान यांच्या जीवाला धोका असल्याचे यापूर्वीही कोर्टात सांगितले होते. इमरान खान कोर्टात येण्यापूर्वी त्यांच्या भोवती कायम सुरक्षा कवच असायचे. पीटीआय या इमरान खान यांच्या पक्षाने एक व्हिडीओ ट्वीट केला आहे त्यामध्ये इमरानच्या वकिलांनी इमरान खान जखमी असल्याचा दावा केला आहे.

# सप्तशृंगीच्या दर्शनासाठी आलेल्या महिलेची सोनसाखळी पोलिसाकडून परत

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** सप्तश्रृंगी गडावर दर्शनासाठी आलेल्या नंदिनी राहुल शिंदे, छत्रपती संभाजी नगर यांची चोरट्याने पळवलेली सोनसाखळी महिला पोलीस नाईक वर्षा निकम यांनी प्रामाणिकपणे परत केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, सप्तश्रृंगी गडावर उन्हाळी सुट्टी मुळे भाविकांची गर्दी होत आहे. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणावर चोऱ्या होत असल्याने याबाबत प्रसारमाध्यमांनी आवाज उठवल्यानंतर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मंगळवार दि.९ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथील नंदिनी राहुल शिंदे या नातेवाईकांसोबत दर्शनासाठी आल्या होत्या. मात्र गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने सप्तशृंगी गडावरील रोपवे ट्रॉली परिसरात त्यांची अंदाजे ६० हजार रुपये किमतीची सोनसाखळी लांबवली. याकाळात वातावरण तंग झाल्याने चोरट्याने सोनसाखळी रोपवेच्या कोपऱ्यात टाकून पळ काढला. गळ्यातील चेन गहाळ झाल्याचे लक्षात येताच शिंदे यांनी तेथे कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस नाईक १३८८ वर्षा निकम यांचेकडे धाव घेतली. त्यानंतर तातडीने कार्यवाही करत पो.नाईक वर्षा निकम यांनी cctv तपासणी करून सोनसाखळी नंदिनी शिंदे हिची असल्याची खात्री पटवत तिला (नंदिनी) परत केली.



सोनसाखळी गहाळ होताच मी पुरते घाबरून गेले. मात्र समोर महिला पोलीस दिसल्याने आधार वाटला व मी त्यांना हकीकत सांगितली. त्यांनी तातडीने कार्यवाही करत सोनसाखळी सापडून परत केली त्याबद्दल त्यांचे आभार. **नंदिनी राहुल शिंदे, छत्रपती संभाजीनगर**

# कुनो उद्यानातील आणखी एका चित्त्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेतून आणल्यानंतर मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात ठेवलेल्या चित्त्यांपैकी आणखी एकाचा मंगळवारी (९ मे) मृत्यू झाला. चित्त्यांमध्ये झालेल्या झुंजीत 'दक्षा' या मादीचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. 'दक्षा'सह आतापर्यंत तीन चित्त्यांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नर 'वायू', 'फिंडा' आणि 'अग्नि' या चित्त्यांची मादी 'दक्षा'बरोबर झुंज झाली.

या झुंजीत 'दक्षा' गंभीररित्या जखमी झाली होती. यानंतर 'दक्षा'चा मृत्यू झाला आहे. यापूर्वी २३ एप्रिलला सहा वर्षाच्या 'उदय' नावाच्या चित्त्याचा मृत्यू झाला होता. दक्षिण आफ्रिकेतील नामिबियातून मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात २० चित्ते आणले गेले होते. यातील तीन चित्त्यांचा आतापर्यंत मृत्यू झाला होता. सर्वात पहिल्यांदा 'साशा' या मादी चित्त्याचा २७ मार्च रोजी मूत्रपिंडाच्या आजाराने मृत्यू झालेला. तर, 'उदय' हा चित्ता २३ एप्रिलला निश्चल अवस्थेत आढळून आला होता. नंतर त्याचाही मृत्यू झाला.

# अवकाळीचे पोंग्यात पाणी, दहा दिवसांत कांदा सडला

## युवा शेतकऱ्याने कांदा उकिरड्यात गाडला

आधुनिक केसरी न्यूज


निफाड : सततच्या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कांदा काढणीसाठी अंतिम टप्प्यात आला असतांनाच पोंग्यात पावसाचे पाणी गेल्याने अल्पावधीतच कांदा सडू लागला आहे. वडगाव पिंगळा (ता. सिन्नर) येथील युवा शेतकरी सागर चंद्रभान मुठाळ यांचा काढलेला उन्हाळी कांदा अवघ्या दहा दिवसांत खळ्यावर सडला असून तो उकिरड्यावर फेकावा लागला आहे.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कधी नव्हे अशा या विचित्र समस्येला सामोरे जावे लागत असून त्यामुळे कांदा साठवणूकीवर याचा मोठा परिणाम होणार आहे. यावर्षी साधारणपणे दि. १४ जानेवारीपासून भाग बदलत अवकाळी पाऊस सुरू आहे. फेब्रुवारी महिन्यांपासून अवकाळी पावसाने रब्बी हंगाम संपूर्ण नेस्तनाबूत केला आहे. ह्या अवकाळी पावसाने रब्बी हंगामात धुमाकूळ घातल्याने हंगामातील गहू, हरबरा, द्राक्षे पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी बांधवांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. कांदा रोपे टाकणीच्या काळात मोसमी पावसाने उशीर केला त्यामुळे कांदा रोपे उशिरा लागवडीस आली. त्यामुळे यावर्षी कांदा हंगामही लांबणीवर पडला. त्यामुळे यावर्षी मोठ्या प्रमाणावर कांदा हा उशिरा काढणीस आला आहे. त्यामुळे हजारो हेक्टर क्षेत्रातील कांदा पिकाला अवकाळीचा फटका बसला आहे. त्यातच वडगाव पिंगळा येथील शेतकऱ्याची हृदयद्रावक घटना समोर आल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. वडगाव पिंगळा येथील युवा शेतकरी सागर चंद्रभान मुठाळ यांनी दहा दिवसांपूर्वी दीडशे क्विंटल कांद्याची काढणी केली. त्यात एकरी उत्पादनात घट झाली. त्यातच सध्या कांदा पिकाला मातीमोल भाव मिळत आहे. त्यामुळे त्यांनी निराश न होता आगामी काळात नाफेडमार्फत खरेदी सुरू होईल व कांद्यास भाव मिळेल या अपेक्षेने कांदा साठवणूक करण्याचा निर्णय घेतला. मात्र दहा दिवस खळ्यावर असलेल्या कांद्याचा उग्र दर्प सुरू झाला. त्यामुळे त्यांनी कांद्याची चाचपणी केली असता त्यांना संपूर्ण कांदे सडलेल्या स्वरूपात आढळले. त्यामुळे वर्षभराची कमाई अशी डोळ्यासमोर मातीमोल झाल्याने ते गर्भगळीत झाले. कांद्यापासून अर्थप्राप्ती सोडाच मात्र पदरमोड करून जे.सी.बी.च्या सहाय्याने कांदा उकिरड्यात गाडावा लागला.



मी साठवणुकीसाठी खळ्यावर आणलेला कांदा अल्पावधीतच सडला आहे. त्यामुळे माझे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांदा साठवणूक करतांना काळजी घ्यावी. शासनाने या गोष्टींची दखल घेऊन तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करावी.
**सागर चंद्रभान मुठाळ, शेतकरी, वडगाव पिंगळा**



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू


आधुनिक केसरी

कामगार संघटनांची पुनर्बांधणी करण्यात आली. स्वच्छ आणि हरित सिंगापूरचे स्वप्न प्रत्यक्षात आले. रोमच्या बाबतीत जसं म्हटलं जातं की ' रोम वॉज नॉट बिल्ट इन या डे ' तसंच सिंगापूरच्या बाबतीत म्हणता येईल. त्यामागे ली, त्यांचे सहकारी आणि त्यांच्या देशातील नागरिकांचे अविरत कष्ट होते, ध्येयपूर्तीचा ध्यास होता. ली यांची पत्नी चू क्वा गेक हिची त्यांना समर्थ साथ होती. चू ही अतिशय बुद्धिमान स्त्री होती. उच्चशिक्षित होती. ली पंतप्रधान होईपर्यंतच्या सगळ्या घटनांची साक्षीदार होती. पण तिने ली यांच्या राज्यकारभारात कधीच ढवळाढवळ केली नाही. ली यांना पूर्ण स्वातंत्र्य व सहकार्य दिले. पण त्याच वेळी ती ली यांची एक चांगली मैत्रीणही झाली आणि जिथे जिथे आवश्यक असेल तिथे तिथे ली यांना आवश्यक



तो सल्लाही दिला. म्हणूनच त्यांचा संसार दृष्ट लागण्यासारखा होता. त्यांच्या संसारवेलीवर तीन फुले उमलली. दोन मुलगे आणि एक मुलगी. ली आणि चू यांनी आपल्या मुलांना शक्य असतानाही जास्त सवलती घेऊ दिल्या नाहीत. त्याचे कारण म्हणजे त्यांना सर्वसामान्यांसारखे जगता यावे. सरकारी निवासस्थान उपलब्ध असूनही ली दाम्पत्य सरकारी बंगल्यात राहायला गेले नाही. आपल्या वडिलोपार्जित घरात राहणेच त्यांनी पसंत केले. मोठा मुलगा ली हैसन लुंग हा अत्यंत बुद्धिमान. ट्रिनिटी कॉलेज ऑफ केम्ब्रिजमधून त्याने गणिततातली ' रँग्लर ' ही पदवी मिळवली. पुढे गणितात प्रगत अभ्यास आणि संशोधनाची संधी असतानाही तो सिंगापूरला परत आला आणि लष्करात दाखल झाला. त्यात पुढे तो कर्नल पदापर्यंत पोहोचला. नंतर राजकारणात येऊन पुढे क्रमशः मंत्री आणि सिंगापूरचा उपपंतप्रधान झाला. आज तेच सिंगापूरच्या पंतप्रधानपदी आहेत. यांग हे ली यांचे दुसरे सुपुत्र. त्यांनी १५ वर्षे लष्करात काम केले.



## आनंदी पहाट

# मैत्रीतून निर्माण होणारी नाती टिकवणे आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या आयुष्यांत अनेक घडामोडी घडत असतात. कितीतरी लोक आपल्या आयुष्यांत येतात आणि जातात. पण सगळ्यांत अधिक लक्षात कोण रहात असेल तर, ते म्हणजे सगे-सोबती अर्थात आपले मित्र-मैत्रिणी. अगदी बालपणीच्या मित्र-मैत्रिणींची नावेही त्यांच्या स्वभावासहित लक्षात राहतात. अर्थात हे सगे-सोबती आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला भेटत असतात. पदोपदी आपण आपल्या आयुष्याची नवनवीन रांगोळी काढत असतो आणि त्यांत विविध रंग भरण्याचे काम आपले सगे-सोबतीच करत असतात. प्रसंगी आपले मन मोकळे करण्याची एक सुरक्षित जागा सुद्धा मित्र-मैत्रिणींपैकीच असते. आपल्या चुका हक्काने दाखवणे असेल अथवा आपले कौतुक करणे असेल, मित्रमंडळी शिवाय ह्यात सहसा पुढाकार इतर कोणी घेत नाही. थट्टा मस्करी करून आणि विनोद सांगून डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसवणाऱ्या मित्रमंडळी शिवाय आपल्याला मनाने अधिक जवळ फारसे कोणी नसते. मैत्रीचे नाते अगदी दुध-पाण्यासारखे असते. दोन्ही एकत्र केले कि ते वेगळे करता येत नाही. काहीवेळा तर तुझं माझं जमेना पण तुझ्याविना करमेना, अशी गत ह्या मैत्रीच्या बाबतीत झाल्याचे आपण अगदी प्रत्येकजणच अनुभवत असतो. एकही क्षण ज्या मित्र-मंडळींशिवाय जात नाही, तेच काही वेळा केवळ सगे-सोबती ठरतात. अनेकांशी दीर्घकाळ संपर्कच होत नाही. आपल्या आयुष्याची दोरी आपल्या मित्रांच्या हातात देताना अगोदर चांगले मित्र निवडणे, त्यांची चांगली पारख करण्याची जाणीव होणे जरुरीचे असते. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचे आणि जिव्हाळ्याचे नाते म्हणजे आपली परस्परांशी असलेली मैत्री. या मैत्रीचा थेट संबंध आपल्या भाव-भावनांशी आणि आपल्या आवडी-निवडीशी देखील असतो. अगदी लहानपणापासून आपले शिक्षण आपल्या बरोबर शिकणाऱ्या आपल्या जिवलग मित्र-मैत्रिणींबरोबर सुरु असते.



आधुनिक केसरी

**शांती योग धाम | स्थितप्रज्ञ ||**

गोंधळल्या मना | स्थिर हो ना जरा ||
शरण विकारा | जाउ नको ||१||
संयमाचे बीज | रूजू दे अंतरी ||
उगा अधांतरी | फिरू नको ||२||
तुझ्या आत आहे | कृष्णाचा निवास ||
परी अर्जुनास | भूल पडे ||३||
जरी हा संसार | नित्य कुरूक्षेत्र ||
लाभो तुज मित्र | चक्रधारी ||४||
मनाच्या वारूला | बुध्दीचा लगाम ||
शांती योग धाम | स्थितप्रज्ञ ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

विस्मरणीयमेकं च
स्मरणीयं तथापरम्।
एतयोर्ध्रुवयोर्मध्ये
जीवति जीवनं नरः ॥1॥
विस्मरणीय आणि स्मरणीय या दोन ध्रुवांमध्ये माणूस जीवन जगत असतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जगत बीज है वासना,
आशा फिर व्यवपार ।
जहाँ आश तहँ वास है, त्रिजग सृष्टि
संसार ।।२८।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/२८

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

जगाचे बीज ( मूळ ) कर्म वासना आहे. त्यामुळेच आशा आणि नंतर कर्मांचा व्यवहार चालतो. जिथे आशा आहे तीथेच जीवांचा वास असतो. अशा प्रकारे त्रिजग सृष्टीचा व्यवहार म्हणजेच संसार चालतो. ज्या पदार्थात मनाचा भाव लागला आहे, ज्याची इच्छा झाली आहे तिथे जीव कर्म करतो आणि त्याचा भोग प्राप्त करतो.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## मुर्तीमंत भगवंत भेटला

आधुनिक केसरी



त्याने अंबरीषाचं रक्षण करण्यासाठी सुदर्शन चक्र सोडले. ते चक्र बार्शीतील ऊत्तरेश्वर मंदिरातील विहिरीत पडले,त्यात दैत्याचा अंत झाला. ऋषींनी अंबरीषाची क्षमा मागितल्यावर सुदर्शन चक्र शांत झाले. पंढरपूरच्या पांडूरंगाला भक्ताने विटेवर उभे केले हे जसे घडले तसे बार्शीत भगवंताने भक्ताला ह्दयाशी धरले. अशी ही अलौकिक कथा आहे. बार्शीतील भगवंताचा आज प्रगटदिन आहे. म्हणून भगवंताला शतकोटी वंदन असं म्हणतात की दशावताराची सुरवात या घटनेपासून सुरू झाली. म्हणून आजच्या दिवसाचे अनन्य साधारण महत्व आहे. भक्तांवर सतत लक्ष ठेवण्यासाठी व आशिर्वाद द्यायला भगवंत या नगरीत स्थिर आहे राजा अंबरीष पायाशी तर लक्ष्मी पाठीशी उभी राहून भक्तांचं रक्षण करते, असं हे एकमेव द्वितीय भगवंताचं दर्शन तर घ्यायलाचं हवं ना!चला तर मग भगवंताचं दर्शन घ्यायला आपण बार्शीला जाऊया.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ब्रूयात् सत्यमप्रियम् ।**
**प्रियं च नानृतं ब्रूयादेप धर्मः सनातनः ॥**


**स्पष्टीकरण - ही एक तारेवरची कसरत आहे. माणसाला सत्य आवडते; पण ते गोड गुळगुळीत असेल तरच. पण आपण जर नुसते गोडच बोललो, तर ऐकणाराची दिशाभूल होईल आणि आपल्या माथी पाप बसेल. अशा वेळी मौन धरणे बरें ! जर सत्य असेल आणि ते प्रियही असेल तर मात्र अवश्य बोलावे. त्यामुळे ऐकणाराचा उत्साह वाढेल. पूर्वजांनी सांगून ठेवलेला हा धर्माचा मार्ग आहे.**

**पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे**

# संत हे चालते-बोलते देवच आहेत

आधुनिक केसरी

व्यवहारात ज्याला चांगले वागता येत नाही, त्याला नाही परमार्थ करता येणार. व्यवहारात झालेल्या गोष्टींचा मनावर परिणाम होऊ देणार नाही असा निश्चय करावा, आणि सद्गुरूआज्ञा प्रमाण मानून तो तडीस न्यावा. साधनावर जोर द्यावा. स्वतः कोण याची ओळख करून घ्यावी. भगवंतापरते कोणी नाही हे कळले म्हणजे मी कोण हे कळते. निर्गुण जरी समजले तरी सगुण नाही सोडू. माझ्या मुखी राम आला यापरते दुसरे भाग्य ते कोणते ? ह्रदयात स्फूर्ती येऊनच आपण बोलतो; मग आमच्या मुखात राम आला तर तो ह्रदयात नाही असे कसे म्हणावे ? तुम्ही मला उपनिषदांतले सांगा म्हटले तर कसे सांगू ? ज्याने जे केले तेच तो सांगणार. एक - गुरुआज्ञापालन याशिवाय दुसरे काहीच मी केले नाही, तर मी दुसरे काय सांगणार ? संताचा समागम केला म्हणजे आपण मार्गाला लागतो. आपण साधूला व्यवहारात आणतो, आणि नंतर तो आपल्याशी व्यवहाराने वागला म्हणजे त्याच्याजवळ समता नाही म्हणून उलट ओरड करतो! संत हे देहाचे रोग बरे करीत नसून, त्या रोगांची भीती नाहीशी करतात. संत हे



चालते-बोलते देवच आहेत. संतांच्या देहाच्या हालचालींना महत्त्व नाही. भगवंताचे नाम सिद्ध करून देणे हाच संतांचा जगावर सर्वांत मोठा उपकार होय. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हेच खरे संतांचे कार्य होय. संतांचा कोणताही मार्ग हा वेदांच्या आणि शास्त्राच्या उलट असणे शक्यच नाही. संत सूर्यासारखे जगावर स्वाभाविक उपकार करतात. सूर्याचे तेज कमी होते आहे असे शास्त्रज्ञ म्हणतात, पण संतांचे तेज मात्र वाढतेच आहे.

श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्माला आलेला मुलगा भीक मागताना पाहून आपल्याला त्याची कीव येते, त्याप्रमाणे मनुष्यजन्माला येऊन आपण दुःख करतो हे पाहून संतांना वाईट वाटते. एकूण योनी इतक्या आहेत की, त्यांमध्ये मनुष्यजन्म येणे कठीण आहे. मनुष्यजन्म येऊन भगवंताची प्राप्ती झाली नाही तर जीवाचे फार नुकसान आहे. म्हणून अत्यंत चिकाटीने संतांचा समागम करावा, त्यांची कृपा प्राप्त करून घ्यावी. संतांनी जो मार्ग आखला त्यावर डोळे मिटून जावे; पडण्याची, अडखळण्याची भीतीच नाही. आपण प्रपंचात इतके खोल जातो, की संतांची हाक ऐकूच येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे. संतवचनावर विश्वास ठेवूया, म्हणजे भगवत्प्रेम लागेलच. ते लागल्यावर विषयप्रेम कमी होईल. म्हणून संतांची संगत करणे एवढे जरी केले तरी कल्याणच होईल.

**आजचे बोधवचन आहे -**
**संत-संगती आणि नामस्मरण यानेच भगवत्प्रेम येईल. श्रीराम समर्थ**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १० मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# नांदूरमधमेश्वर धरणातील पानवेली काढाव्यात

## पालकमंत्री दादाजी भुसेंकडे शिवसेना तालुका प्रमुख प्रकाश पाटील यांची मागणी





आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नाशिक, नगर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सिंचनासाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी महत्वपूर्ण असलेल्या नांदूरमध्यमेश्वर धरणाची क्षमता घटली असून या धरणातील गाळ व पानवेली तातडीने काढण्यात याव्यात अशी मागणी शिवसेना निफाड तालुका प्रमुख प्रकाश पाटील यांनी पालकमंत्री ना.दादा भुसे यांचेकडे केली आहे.

निफाड तालुक्यातील नांदूरमध्यमेश्वर धरणाची १०५० द.ल.फु.ट प्रकल्पीय क्षमता असली तरी हे धरण गाळ व पनवेलींनी व्यापल्याने त्याची क्षमता अवघी २०० द.ल.घ.फु. क्षमता उरली आहे. त्यामुळे या धरणातून उगम पावणारे गोदावरी कालवे तसेच या धरणावर अवलंबून असणाऱ्या पाणी योजना धोक्यात आल्या आहेत. नाशिक महानगरपालिकेच्या आडमुठेपणामुळे नाशिकच्या सर्व पानवेली गोदावरी नदीद्वारे वाहत येऊन धरणामध्ये मोठ्या प्रमाणात जमा झाल्या आहेत, त्यामुळे मोठे प्रदूषण निर्माण झाले आहे. याबाबत वनविभागाने देखील नाशिक मनपाकडे पत्र पाठवून कळवले आहे. धरणात साठलेल्या पनवेली सडल्यामुळे पाणी पिवळे झाले असून पाण्याची दुर्गंधी सुटली आहे. पानवेलींचा लवकरात लवकर बंदोबस्त न केल्यास वैजापूर, कोपरगाव, निफाड, येवला, सिन्नर या तालुक्यातील पिण्याच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या लाखो नागरिकांना प्रदूषित पाण्यामुळे गंभीर स्वरूपाचे आरोग्याच्या त्रासास सामोरे जावे लागणार आहे. या गंभीर बाबीची पालकमंत्री दादाजी भुसे यांनी दखल घेऊन महसूल विभाग, पाटबंधारे विभाग व वन विभाग यांच्या संयुक्तरित्या तसेच नगरपालिकेच्या बोटीद्वारे संपूर्ण पानवेली तात्काळ काढण्याबाबत सूचना कराव्या अशा प्रकारची मागणी पालकमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश पाटील व सिन्नर पं.स.चे माजी सभापती उद्धव सांगळे यांनी केली आहे. निवेदनाची अभ्यासपूर्ण पुस्तिका नाशिकचे जिल्हाधिकारी गंगाधरण डी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अमिषा मित्तल यांना देखील देण्यात आली आहे.

# 'जुनी पेन्शन एकच मिशन' आंदोलनाला शिक्षक सेनेचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** जूनी पेन्शन एकच मिशन या आझाद मैदान मुंबई येथील आंदोलनाला महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना प्रांताध्यक्ष सन्मानिय ज.मो.अभ्यंकर साहेब यांनी भेट देवून प्रत्यक्ष सहभाग नोंदवून जाहीर पाठिंबा दिला आहे. १ नोव्हेंबर २००५ पुर्वी विनाअनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त व त्यानंतर १००% अनुदानावर आलेले मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी महाराष्ट्र राज्य जूनी पेन्शन समन्वयक संघ यांच्या आंदोलकांसमोर मार्गदर्शनपर भाषणात जे हक्काचे आहे व नियमानुसार जूनी पेन्शन योजना संबंधीतांना मिळायलाच हवे असे प्रतिपादन केले व आंदोलनाला पाठिंबा दिला. सोबत शिक्षक आमदार श्री किशोर दराडे, माजी आमदार श्रीकांत देशपांडे व दत्तात्रय सावंत, सेकंडरी स्कूल एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटी लि मुंबई चे चेअरमन चंद्रकात पाटील, मुंबई विभाग अध्यक्ष श्री अजित चव्हाण, प्रादेशिक सचिव श्री मुकेश शिरसाट हे सुद्धा उपस्थित होते, असे नितिन चौधरी राज्य समन्वयक व विठुभाऊ चव्हाण राज्य उपाध्यक्ष शिक्षक सेना यांनी ही माहीती दिली.







# राज्यव्यापी मराठा आरक्षण मंथन परिषद संपन्न

## ज्येष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते यांचे अभ्यासपूर्ण सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कोथुर्णे पवनानगर, ता. मावळ जिल्हा पुणे येथे कायदेशीर व घटनात्मक मंथन करण्यासाठी झालेल्या राज्यव्यापी मराठा आरक्षण मंथन परिषदे मध्ये जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील अभ्यास पुर्ण सादरीकरण केले.त्यांनी आपल्या आयुष्याचे ३० वर्ष आरक्षणाचा कायदेशीर लढा लढला त्यांना आरक्षणाचे संत मानल्या जात असून ते आरक्षणाचे चालते बोलते विद्यापीठच आहे त्यांनी या मंथन परिषदेत मार्गदर्शन केले.

या आरक्षण मंथन परिषदेचे उद्घाटन दिपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. मराठा आरक्षण कुठे अडले आहे ? पुढे काय उपाय योजना कराव्या हे अत्यंत अभ्यासपूर्ण पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सादरी करण करून

रिव्हिव पीटिशन तसेच क्यूरेटीव्ह पीटिशन मधील फरक व त्या मध्ये सामावेश करावयाचे कायदेशीर मुद्दे व घटनात्मक न्याय निवाडे याचे प्रचंड अभ्यासून असे सादरी करण करुन त्यांच्या दुरदृष्टीचा विचार समाज बांधवा सामोर या राज्य स्तरीय मंथन परिषदेत सकारात्मक पद्धतीने सादर करण्यात आला. मराठा क्रांती मोर्चा चे रवींद्र काळे यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त करतांना नमूद केले की, आरक्षण मिळविण्या साठी घटनात्मक व कायदेशीर बाबीच न्याय मिळवुन देऊ शकतील. या राज्य स्तरीय मंथन परिषदेच्या आयोजनाची चोख व्यवस्था करण्याचे काम संतोष दळवी यांनी केले होते त्यांचे मराठा समाजाच्या वतीने आभारव्यक्त करण्यात आले.जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील लढत आहेत त्यांना समाजाने भक्कम साथ द्यावी त्यांना ताकद द्यावी असेही ही आवाहान करण्यात आले आहे.

दिलीपराव गायकवाड म्हणाले की, कायदेशीर लढा आणि आंदोलनात्मक लढा असे दोन भाग करावे लागतील तर रामचंद्र शेडगे म्हणाले की, आरक्षण कायदेशीर लढाच मिळवून देऊ शकते.संयोजक म्हणून संतोष दळवी यांनी या मंथन परिषदेचे प्रास्ताविक केले.या मंथन परिषदेस राज्य भरा तील विविध जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते त्यात वैभव बागल, अनिल संकपाळ, दत्तात्रय शेळके, संतोष चव्हाण, गोपाळ चोपडे वैभव पेजगे, जगन्नाथ उदुगडे, शिशीर धुमाळ, संदिप तेजसे, योगेश देशमुख, सुनिल निमसे, भरत दळवी, रामभाऊ ढगे, अविनाश पाटील, अमोल दळवी, विश्वास पाटील, किसन पाटील, नामदेव दळवी, भागुजी दळवी निवृत्ती दळवी, मारोती पाटील, बळीराम पाटील, मंगेश कुमार पाटील, गणपत पाटील या सह अनेक जिल्ह्यातील मान्यवर उपस्थीत होते.सदरच्या मंथन परिषदेत अनेक ठराव मंजुर करण्यात आले त्यात राज्य शासनास सादर करावयाचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सादरी करणासाठी वेळ मागणे चा महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आला.



# श्रीकांत शिंदेंचा टोला

आधुनिक केसरी

महाविकास आघाडीची वज्रमूठ राहणार की नाही? हे बघावे लागेल असे म्हणत खासदार श्रीकांत शिंदे यांनी महाविकास आघाडीवर टीका केली आहे. महाविकास आघाडीचे नेते इतके दिवस सरकारवर टीका करत होते. आता एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. हे सरकार कुठल्या विचारांनी नाही तर सत्तेसाठी खुर्चीवर आले होते असेही श्रीकांत शिंदेंनी म्हटले आहे. तसेच अजित पवार यांच्यावरही श्रीकांत शिंदेंनी टीका केली आहे. आज वज्रमूठ दाखवली जाते आहे ती वज्रमूठ राहते की वज्रझूठ ठरते ते पण बघावे लागेल असेही श्रीकांत शिंदे यांनी म्हटले आहे. अजित पवारांची ओळख ही त्यांच्या काकांमुळे आहे. दोन दिवस आधी परिस्थिती पाहिली आहे. अजित पवारांना वाटले शरद पवारांच्या राजीनाम्यानंतर मलाच राष्ट्रीय अध्यक्ष करतील असे अजित पवारांना वाटले होते. मात्र काय घडले ते आपण पाहिले. त्यामुळे काका मला वाचवा हे म्हणायची वेळ त्यांच्यावर आली आहे असाही टोला श्रीकांत शिंदे यांनी लगावला. अशा लोकांनी मुख्यमंत्र्यांना कोण ओळखते अशी टीका करु नये असेही श्रीकांत शिंदेंनी सुनावले आहे. आमचे सरकार अनेक वर्षे टिकणार आहे. त्यामुळे कुणाला काही पर्यायी जॉब हवा असेल तर भविष्य वर्तवण्याचे काम नाना पटोले यांनी करावे असाही टोला श्रीकांत शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना लगावला. महाराष्ट्रात १० महिन्यांपूर्वी जे सरकार स्थापन झाले त्या धक्क्यातून अद्याप विरोधक सावरलेले नाहीत. त्यामुळे दररोज सकाळी आमच्यावर टीका केली जाते. तसंच पातळी सोडून ही टीका केली जाते आहे. महाराष्ट्राची संस्कृती महाविकास आघाडीच्या नेत्यांनी घालवली असेही श्रीकांत शिंदेंनी म्हटले आहे. महाविकास आघाडी सरकार हे सत्तेसाठी आलेले लोक आहेत. आमचे सरकार चांगले काम करते आहे. त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची जमीन सरकली आहे. आदित्य ठाकरेंच्या तोंडी काँट्रॅक्टरची भाषा आहे. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेले लोक आज ती भाषा बोलत आहेत कारण २५ वर्षे तेच करत आले आहेत, असे म्हणत त्यांनी आदित्य ठाकरेंनाही टोला लगावला आहे.

# कुस्तीपटुंचे आंदोलन शेतकरी आंदोलनासारखे उग्र



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**जंतरमंतरवर कुस्तीपटूंचे धरणे आंदोलन सुरूच आहे. दरम्यान, ८ मे रोजी कुस्तीपटूंच्या समर्थनार्थ उतरलेल्या भारतीय किसान युनियनचे (बीकेयू) कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतरवर पोहोचले. जिथे ते पोलिसांचे बॅरिकेड्स तोडताना दिसले. यावेळी तेथे गोंधळाचे वातावरणही पाहायला मिळाले. प्रत्यक्षात सोमवारी कुस्तीपटूंच्या समर्थनार्थ जंतरमंतरवर मोठ्या संख्येने पोहोचलेले शेतकरी पोलिसांचे बॅरिकेड तोडून पुढे गेले.यावेळी त्यांनी कुस्तीपटूंच्या समर्थनार्थ मोदी सरकारविरोधात घोषणाबाजी केली. जोपर्यंत आम्हाला विचारले जात नाही तोपर्यंत आम्ही जंतरमंतरवरच राहू, असे या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.किसान युनियन मुळे कुस्ती पटुंचे आंदोलन अधिक आक्रमक होण्याची व है आंदोलन अधिक चिघळण्याची शक्यता असून सरकारने कुस्ती पटुंचे प्रश्न सोडवायला हवे,शोषण व अत्याचार करणाऱ्या विरोधात कारवाई करून आंदोलकांना न्याय मिळवून द्यायला पाहिजे,अन्यथा है आंदोलन शेतकरी आंदोलनासारखी ठिणगी पेटू शकते.**

हरियाणातील सोनीपतमध्ये हरियाणातील खत्री खाप आणि जटवाडा ३६० खापने दिल्लीत धरणे धरणाऱ्या कुस्तीपटूंच्या समर्थनार्थ मोठे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. आरोपी भाजप खासदार आणि भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर सरकारने कारवाई केली नाही, तर शेतकरी आंदोलनात ज्याप्रमाणे दिल्ली जाम केली होती, त्याचप्रमाणे कुस्तीपटूंच्या समर्थनार्थ खाप पुन्हा दिल्ली जाम करतील, असा इशारा दोन्ही खापांनी दिला. पासून मागे हटणार नाही. दिल्लीतील पाणी, दूध आणि रेशनचा पुरवठाही विस्कळीत होईल, असा दावा खाप सदस्यांनी केला.

संपात सहभागी होण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांनी पैलवानांच्या मागण्यांना पाठिंबा दिला आहे.भाजप खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर कुस्तीपटूंनी लैंगिक छळाचा आरोप केला आहे. जोपर्यंत ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर कारवा ई होत नाही तोपर्यंत संप संपवणार नसल्याचे कुस्तीपटूंचे म्हणणे आहे. यावेळी त्यांनी कुस्तीपटूंच्या समर्थनार्थ मोदी सरकारविरोधात घोषणाबाजी केली. जोपर्यंत आम्हाला विचारले जात नाही तोपर्यंत आम्ही जंतरमंतरवरच राहू, असे या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. आम्ही शेतकरी आंदोलनातही गेलो होतो आणि येथेही राहणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

संपात सहभागी होण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांनी पैलवानांच्या मागण्यांना पाठिंबा दिला आहे.भाजप खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर कुस्तीपटूंनी लैंगिक छळाचा आरोप केला आहे. जोपर्यंत ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर कारवाई होत नाही तोपर्यंत संप संपवणार नसल्याचे कुस्तीपटूंचे म्हणणे आहे.

किसान आंदोलकांनी बॅरिकेड्स ओढून आपला निषेध जाहीर केला. याचा एक व्हिडिओही समोर आला आहे.



ज्यामध्ये मोठ्या संख्येने लोक बॅरिकेडिंग हटवताना दिसत आहेत. त्यांच्या हातात झेंडेही दिसत आहेत. याशिवाय आंदोलक शेतकरी व्हिडीओमध्ये बॅरिकेड्स ओढून घोषणाबाजी करताना दिसत आहेत. भारतीय किसान युनियनचे नेते राकेश टिकैत यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने शेतकरी कुस्तीपटूंना पाठिंबा देण्यासाठी जंतरमंतरवर पोहोचले. त्याचवेळी टिकैत यांनी आपल्या भाषणात असेही स्पष्ट केले होते की, ब्रिजभूषण यांना अटक करण्यासाठी आम्ही सरकारला १५ दिवसांचा अवधी देतो आणि या १५ दिवसांत ब्रिजभूषण यांना अटक न झाल्यास आंदोलनाची पुढील रूपरेषा तयार केली जाईल. त्याचवेळी लैंगिक शोषणाच्या आरोपांनी घेरलेले भारतीय कुस्ती महासंघाचे प्रमुख ब्रिजभूषण शरण सिंह यांनी आपल्यावर लावण्यात आलेल्या आरोपांमध्ये जराही तथ्य आढळल्यास आपण आत्महत्या करू, असे म्हटले आहे. दुसरीकडे, राजकीय कुरघोडीमुळे अशी आंदोलने केली जात असल्याचे ब्रिजभूषण यांचे म्हणणे आहे. आंदोलनाला राजकीय पक्षांचा पाठिंबा आहे.

बजरंग पुनिया, विनेश फोगट, साक्षी मलिक यांच्यासह अव्वल कुस्तीपटू २३एप्रिलपासून दिल्लीच्या जंतर-मंतरवर रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडिया ( WFI ) चे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात एका अल्पवयीनासह सात कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी निषेध करत आहेत. त्यांच्या अटकेची मागणी करत आहेत.

जंतरमंतरवर वादग्रस्त घोषणाबाजी

जंतरमंतरवर मोदी तेरी कबर खुदेगी अशा घोषणा देण्यात आल्या. योगी, तुमची कबर खोदली जाईल, अशा घोषणाही दिल्या जात होत्या. जंतरमंतरवर लावलेले बॅरिकेडिंग तोडताना शेतकऱ्यांचा जमाव दिसला. बॅरिकेडिंग पाडल्यानंतर शेतकऱ्यांचा जमाव आंदोलनस्थळी पोहोचला. शेतकरी नेत्याने कबुली दिली की ते लोक गोंधळाच्या प्लॅनिंगने येथे आले होते. तसेच, थांबवले तर बॅरिकेडिंगही तोडून टाकू, असा विचार करून ते आले होते. पंजाबमधून आलेल्या शेतकत्यांची बॅरिकेड्स तोडण्याची त्यांची योजना होती.

# अंगावर शहारे आणणारा चित्रपट; द केरळा स्टोरी




सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**एक चित्रपट सध्या खूप चर्चेत आहे. द केरळा स्टोरी; असं या चित्रपटाचं नावं आहे.; द केरळा स्टोरी' या चित्रपटाची कथा सत्य घटनेवर आधारित आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आलाय. द केरळा स्टोरी; हा चित्रपट केरळ राज्यातील अतिशय गंभीर विषयावर बेतला आहे. केरळ राज्यातून तरुण मुली, महिला बेपत्ता होण्याच्या घटना आजही घडतच आहेत. केरळ राज्यातून बेपत्ता झालेल्या ३२,००० मुली आणि महिलांचं नेमकं काय झालं, त्या कुठं गेल्या यामागचं सत्य या चित्रपटातून दाखवण्यात येणार आहे. ५ मे रोजी हा चित्रपट मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, २००९ मध्ये केरळ आणि मँगलोरमधून सुमारे ३२ हजार हिंदू आणि ख्रिश्चन मुलींचं अपहरण करण्यात आलं होतं. या मुली लव्ह जिहाद'ला बळी पडल्या. त्यांना बळजबरीने इस्लाम धर्म स्वीकारायला लावलं होतं. त्यांच्यापैकी बहुतांश मुलींना नंतर सीरिया, अफगाणिस्तान आणि इतर भागात पाठवलं गेलंय.**

या मुली पुन्हा घरी परतल्याच नाहीत, असं सांगण्यात येतं. केरळमध्ये मुलींची कशी फसवणूक केली जाते, कसं त्यांचं ब्रेनवॉश केलं जातं. हिजाब घालणाऱ्या महिलांवर बलात्कार होत नाही, हे त्यांना दाखवलं जातं. त्यामुळं या महिला, मुली इस्लाम धर्म स्वीकारतात. यानंतर त्यांनाआयएसआयएसच्या आतंकवाद्यांसमोर उभं केलं जातं. त्यानंतर सुरू होतो, अंगावर काटा आणणारा खेळ. आतंकवाद्यांचा क्रुर चेहरा दिसतो. असं काहीसं या चित्रपटाच कथानक आहे. या चित्रपटात एक काल्पनिक कथानक मांडण्यात आलं असलं तरी केरळमधील एका दुर्दैवी घटनेचं दाहक वास्तव आपल्यापर्यंत पोहोचवायचा प्रयत्न केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश मधील चंदन तस्करी बद्दल आपण ऐकून आहोत मात्र याच केरळ मधून होणा-या मानवी तस्करी बद्दल अद्याप लोकांना फारसं काही माहीत नव्हत आणि यावर कोणत्याही चित्रपट निर्मात्याने चित्रपट बनवलेलाही नव्हता. द केरळा स्टोरीया चित्रपटाची निर्मिती विपुल शाह यांनी केली असून सुदिप्तो सेन या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. विपुल शाह यांनी याअगोदर 'ह्युमन' नावाच्या एका संवेदनशिल वेबसिरीजची निर्मिती केली होती. या चित्रपटासाठी त्यांनी चार वर्षे संशोधन आणि अभ्यास केला आहे. केरळ मधील मुलींच्या संघर्षाची ही गाथा बघून नक्कीच सर्वांचे डोळे पाणावतील. या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांना भारतात घडलेल्या अजून एका अन्यायाबद्दल माहिती मिळेल. या चित्रपटातअत्यंत हिंसक आणि हृदयद्रावक दृश्य तसेच काही बोल्ड संवादही ऐकायला मिळत आहेत. "हिजाब परिधान केलेल्या एकाही मुलीचा बलात्कार झालेला नाही." असे संवादहीआहेत असे या चित्रपटाच्या ट्रेलर वरून लक्षात येते. अदा शर्मा, योगिता बिहानी, सोनिया बानी, सिद्धी इदनानी या अभिनेत्री चित्रपटात मुख्य भूमिकेत आहेत. हा चित्रपट हिंदी, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम या भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात येणार आहे. चित्रपटावर बंदीची मागणी या चित्रपटामुळे धार्मिक तेढ निर्माण होण्याची शक्यता पाहता या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी होत आहे. तमिळनाडूतील एका पत्रकाराने चित्रपटावर बंदी घालण्यासाठी केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळ, केरळचे मुख्यमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडे याचिका केली आहे. अलीकडेच, सत्ताधारी डाव्या लोकशाही आघाडी-काँग्रेसने यावर स्थगिती देण्याची मागणी केली, त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावर तातडीने सुनावणी करण्यास नकार दिला. खरेतर, न्यायमूर्ती केएम जोसेफ आणि न्यायमूर्ती बीव्ही नगररत्न यांच्या खंडपीठाने सांगितले की, चित्रपटाच्या प्रदर्शनाला आव्हान देणे हा योग्य उपाय नाही. न्यायालयात याचिका दाखल करून काही एखाद्या चित्रपटावर बंदी घालण्याचा हेतू सफल होत नाही.. उलट संबंधित




चित्रपटालाच प्रसिद्धी मात्र मिळते, हे अलीकडे वारंवार दिसलेले आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून केरळची प्रतिमा मलीन करून तेथे धार्मिक भेदभाव पसरवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. या चित्रपटातून चुकीची माहिती आणि प्रोपोगंडा पसरवण्यात येतो आहे असं या चित्रपटाला विरोध करणा-यांचे म्हणणे आहे. 'द केरळ स्टोरी' या चित्रपटावर बंदी घालण्यास आपण अजिबात उत्सुक नसल्याचे संकेत केरळचे उच्च न्यायालय देत असताना आणि सर्वोच्च न्यायालयाने आमच्यापुढे ही याचिका नकोच- ती उच्च न्यायालयातच आधी चालवा- असे म्हटलेले असताना, केरळ सरकार तरी बंदीचा उपाय योजणार काय, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. या चित्रपटाला झालेला विरोध पाहाता या चित्रपटातील अभिनेत्री अदा शर्मा हिनं आपली भुमिका सोशल मीडियावरून मांडली होती. केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळाने या चित्रपटाला १० कटसह अ प्रमाणपत्र दिले आहे. त्यात केरळच्या माजी मुख्यमंत्र्यांची एक टीव्ही मुलाखतही आहे. हे केरळचे मुख्यमंत्री व्ही.एस. अच्युतानंदन असल्याचे सांगितलं जात आहे. त्यांनी केरळ राज्य हे इस्लामिक राज्य बनण्याची भविष्यवाणी केली होती. एका दृष्यात हिंदू देवदेवतांबद्दल टिप्पणी होती, तीही काढून टाकण्यात आली आहे. भारतीय कम्युनिस्टांचा दुट्टपीपणा दाखवणाऱ्या टिप्पणीतून भारतीय हा शब्द काढून टाकण्यात आला आहे. चित्रपट पाहिल्यानंतर बोर्डाच्या चौकशी समितीने निर्मात्यांना त्यात १० बदल करण्यास सांगितले होते. तसेच चित्रपटातील आकडेवारीचे कागदोपत्री पुरावेही सादर करण्यास सांगितले होते. या चित्रपटातील अनेक संवाद आणि दृश्यांवर सेन्सॉर बोर्डाने टीका केली आहे. द केरळा स्टोरी या चित्रपटाला प्रेक्षकांची पसंती मिळेल की नाही ? या प्रश्नाचं उत्तर लवकरच मिळेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बीडीओंचा तिढा काही मिटेना, विहिरीचे ग्रहण काही सुटेना

## हजारों कामे खोळंबली महिन्यांपासून मजुरांवर संकट

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** पंचायत समितीच्या बिडोओ संपामुळेः गत २९ दिवसांपासून राज्यातील बीडीओंनी संप पुकारला आहे. यामुळे सोयगाव तालुक्यातील व ग्रामीण भागातील गाव विकासाची कामे थांबली आहेत. ऐन उन्हाळ्यात बीडीओच्या संपामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कामांना ब्रेक लागला आहे. यातून हजारोवर कामे प्रभावित झाले आहेत. बोगस मजुरांच्या प्रकरणात बीडीओंना जबाबदार धरण्यात येऊ नये, या प्रमुख मागणीसह ग्रामपंचायत स्तरावर रोजगार हमी योजनेच्या कामांचे मस्टर काढण्यात यावे यासाठी राज्यात बीडीओनी आंदोलन सुरू केले आहे. ११ एप्रिलपासून राज्यात सुरू झालेल्या या आंदोलनाला सरकारने अजूनही कुठलेही उत्तर दिले नाही. यामुळे हे आंदोलन अजूनही कायम आहे. मात्र, या आंदोलनामुळे बीडीओंच्या अखत्यारीत येणारी कामे खोळंबली आहेत. घरकुलाच्या महत्त्वपूर्ण कामाला युद्ध पातळीवर करण्याचे आदेश आहेत. मात्र, सोयगाव पंचायत समितीच्या बीडीओच्या संपामुळे घरकुलाचे मस्टरच निघणे बंद झाले आहे. यातून मजुरांची मजुरी निघत नाही. परिणामी, उन्हाळ्यातील घरकुलाची कामे थांबली आहेत. यापूर्वी वाळू नसल्याने घरकुलाची कामे थांबली होती. आता बीडीओच्या संपामुळे कामे थांबले आहेत. पुढे पावसाळा असून, यात कामे कशी पूर्ण होणार, हा प्रश्न लाभार्थी यांना पडला आहे.

यासोबत रोहयोच्या माध्यमातून गोठ्यांच्या कामाला मंजुरी मिळाली. मात्र, मजुरांच्या कामाचे मस्टरच निघाले नाही. यामुळे गोठ्यांची कामे थांबली आहेत. तर मंजूर झालेल्या सिंचन विहिरींची कामे थांबली आहेत. इतकेच नव्हे, तर पाणंद रस्त्यांवर असेलल्या मजुरांचे मस्टरही निघाले नाही. यातून पाणंद रस्त्यांच्या कामाला खीळ बसली आहे. वृक्ष लागवडीच्या कामात खड्डे तयार करणे आणि नर्सरीमध्ये वृक्षाचे संगोपन करण्याचे काम रोजगार हमी योजनेतून केले जाते. या कामावरील मजुरांचे रजिस्टरच मिळाले नाही. यातून मजुरांची कामे थांबली आहेत. ग्रामविकासाच्या योजना प्रभावित झाल्या आहेत. शासन स्तरावर अजूनही या संपाबाबत कुठलाही तोडगा काढण्यात आलेला नाही. आता पावसाळा सुरू झाल्यानंतर पुन्हा कामे थांबवावी लागतात की काय ?




**महिन्यांपासून सोयगावात मजुरांवर संकट :** रोजगार हमी योजनेच्या कामांवर असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मजुरांच्या हाताला रोजगार नाही .यातून मजूर चांगलेच अडचणीत आले आहेत .अजूनही संप मिटला नाही .यामुळे मजूर चांगलेच वैतागले आहेत .या मजुरांवर उपासमार ओढावली आहे .
**माजी सभापती धरमसिंग चव्हाण सोयगाव,नादांतांडा**

**सोयगाव पंचायत समितीचे कामे ठप्प :** सोयगाव पंचायत समितीमध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील कामे सुरु आहे .प्रत्येक छोटे मोठे असे हजारों कामे बीडीओच्या संपामुळे थांबली आहे .हा संप मिटण्याचे कुठलेही चिन्ह दिसून येत नाही .त्यातून विकासकामे प्रभावित झाली आहेत .
**सरपंच सौ . रत्नाताई सुरेश चव्हाण, घाणेगांव तांडा, ता . सोयगाव**



# खासदार असदुद्दीन ओवेसी यांची धुळ्यात हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आ. फारुक शाह यांच्या संयोजनाने धुळे शहरात गोरगरीब मुस्लिम यांचा सामूहिक विवाह सोहळा ठेवण्यात आला यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून असदुद्दीन ओवेसी यांना आमंत्रित करण्यात आले होते. व शहर विकास कामाच्या शुभारंभासाठी ओवेसी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. धुळे शहरातील आमदार डॉ. फारुक शहा यांनी शहरातील विकास काम आणि सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता त्या ठिकाणी असंख्य कार्यकर्ते व त्यांचे चाहणारे यांच्या हजारो जनसमुदाय होता. सामूहिक विवाह सोहळा ठिकाणी नागरिकांच्या सहकार्य न मिळाल्याने पोलीस कर्मचाऱ्यांना त्या ठिकाणी त्रास सहन करावा लागला व पत्रकारांसाठी कुठल्याही नियोजन नसून त्यामुळे तेथे नाराजगी व्यक्त करण्यात आली.यावेळी खासदार असोद्दीन ओवेसी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माध्यमांशी बोलताना ओवेसी म्हणाले की द केरला चित्रपट चुकीच्या तथ्यावर स्टोरी बनवली आहे, चित्रपटात सत्य नाही तरीपण प्रंतप्रधान चित्रपट प्रमोट करत आहेत, तसेच राज्यात मुली बेपत्ता झाल्याबद्दल गृहमंत्री फडणवीस यांनी बोलले पाहिजे, लव जिहाद वर बोलणाऱ्यांनी या मुद्द्यावर बोलावे सरकारचे हे अपयश आहे, सुरू असलेले कर्नाटक निवडणुकीत लोकांनी मोठ्या संख्येने मतदान करावे असे देखील यावेळी आव्हान कर्नाटकाच्या जनतेला ओविसी यांनी केला आहे.

# रेल्वेची 'दक्षिण भारत शुभ यात्रा' स्पेशल ट्रेन

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** महाराष्ट्र व छत्तीसगड या राज्यातील यात्रा करण्यास इच्छूक असणाऱ्यांना दक्षिण मध्य पूर्व रेल्वे विभागाने विशेष सोय दिली आहे. विलासपूर ते रामेश्वरम् या दरम्यान दक्षिण भारत शुभ यात्रा ही विशेष गाडी धावणार आहे. पंचवीस मे रोजी यात्रा शुभारंभ विलासपूर येथून होणार आहे. या स्थानकासह भाटापारा, नेवरा, रायपूर, दुर्ग, राजनांदगाव, गोंदिया, तिरोडा, भंडारा रोड, नागपूर, सेवाग्राम व बल्लारशा या स्थानकांतून पर्यटक घेतल्या जाणार आहेत. त्यानंतर रामेश्वरम्, मदुराई, तिरुपती व मरकपूर येथे थांबे राहणार. या स्थानक परिसरातील श्री शैलम, मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग व अन्य स्थळांचे दर्शन घडविण्यात येणार आहे. सात दिवस, आठ रात्री असा कालावधी असून प्रवास, भोजन, हॉटेल मुक्काम, पर्यटन दर्शन, गाडी अशा सुविधा पंधरा हजार रुपयांत मिळतील. एकतीस मे रोजी परतीचा प्रवास सुरू होणार. अकरा डब्ब्यांची ही गाडी नॉन एसी आहे. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' योजनेअंतर्गत ही यात्रा असल्याची माहिती इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टुरिझमच्या सह व्यवस्थापक डॉ. क्रांती सावरकर यांनी माध्यमांना दिली आहे.




महाराष्ट्र Business Katta












# काय भुललासी वरलिया रंगा



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**विठ्ठल विठ्ठल गजरी । अवघी दुमदुमली पंढरी । होतो नामाचा गजर । दिंड्या पताकांचा भार ।। निवृत्ती ज्ञानदेव सोपान। अपार वैष्णव ते जाण ।। हरि कीर्तनाची दाटी । तेथें चोखा घाली मिठी ।। या चोखोबांच्या अभंगानेच साधारणपणे भजनात वा किर्तनाचा समारोप करण्यात येतो. चोखोबारायांचे हे भजन म्हणजे भजनयज्ञातील पुर्णाहूतीच म्हटल्यास गैर ठरणार नाही. विदर्भाच्या बुलढाणा जिल्यातील मेहुणराजा (ता.देऊळगाव राजा) हे मूळ गाव असलेले दामा आणि सावित्री हे चोखोबांचे आईवडील. चोखोबाच्या पत्नीचे नाव सोयराबाई व मुलाचे नाव कर्ममेळा. चोखोबाला निर्मळा नावाची एक बहीण होती. त्यांचे सारे कुटुंबच विठ्ठलभक्त होते.**

त्या सर्वांनी मिळून बरीच अभंग रचना केली आहे. संत नामदेवांनी चोखामेळाला विठ्ठल नामाचा अनुग्रह दिला होता. चोखामेळा यांनी शिक्षणाचा वा सामाजिकतेचा कुठलाही वारसा नसतांना केवळ कालांतराने विठ्ठलभक्तीच्या आधारावर इतकी अत्त्युच्य अध्यात्मिक पातळी गाठली की, पांडुरंगाच्या दर्शनाला जाताना प्रथम चोखोबाच्या समाधीचे दर्शन घेण्याचा प्रघात पडला. वारकरी संप्रदायातील महान संत चोखामेळा हे जातीने महार असल्याने पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराचे पुजारी मंदिरात येऊ देत नसत, तेव्हा उपेक्षितांची कैफियत तळमळीने मांडतांना चोखामेळा म्हणजेच चोखोबा आपल्या अभंगातून म्हणतात-

**उंबरठ्याशी कैसे शिवू । आम्ही जाती हीन ।।**
**रूप तुझे कैसे पाहू ।त्यात आम्ही दीन ।।**
**पायरीशी होऊ दंग ।गाउनी अभंग ।।**

वर्णव्यवस्थेमुळे चोखोबाने कितीतरी शिक्षा विनाकारण भोगल्या, पण ही जगरहाटी आपण एकटे बदलू शकत नाही याचे भान त्यांना होते. सांसारिक कटकटीनेही ते त्रासून गेले होते. विठ्ठल नामामुळेच आपल्या संघर्षमय जीवनात आपण तरलो असल्याचे ते सांगतात.

ज्ञानदेवादी संतमंडळात चोखोबाला फार मानाचे स्थान होते. विठ्ठलाचा आवडता भक्त असून प्रत्यक्ष विठ्ठलच एकदा चोखोबांच्या घरी जेवायला आले होते, असे त्यांच्या पुढील अभंगावरून लक्षात येते.

**विठोबा पाहुणा आला आमचे घरा ।**
**निंबलोण करा जिवेभावे ।।**
**पंचप्राणज्योती ओवाळूनि आरती ।**
**ओवाळीला पती रुक्माईचा ।।**
**षडरस पक्वान्ने विस्तारिले ताट ।**
**जेवू एकवट चोखा म्हणे ।।**

चोखोबा जातीने महार म्हणून पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराचे पुजारी त्यांना मंदिरात येण्यास मज्जाव करत. विठ्ठलाचे प्रत्यक्ष दर्शन व्हावे, अशी चोखोबाची उत्कट इच्छा होती; पण पुजारी त्यांच्या विनंतीस दाद देत नसत. अशावेळी ते एकदा पुजाऱ्यांना म्हणाले -

**ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा ।**
**काय भुललासी वरलिया रंगा ।।**
**कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा।**
**काय भुललासी वरलिया रंगा।।**
**नदी डोंगी परी जळ नोहे डोंगे।**
**काय भुललासी वरलिया रंगे।।**
**चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ।**
**काय भुललासी वरलिया रंगा ।।**

खाचखळग्यातून वळणावळणाने जीवन प्रवाहाचा प्रवास करततांना विठ्ठलभक्तीत तल्लीन झालेले चोखामेळा विठ्ठलाशी असे काही एकरूप झाले की पुढे पांडुरंगानेच एके दिवशी चोखोबाला देवळात आणून दर्शन दिले; परतीच्या वेळी देवाने चोखोबाला आपल्या गळ्यातील रत्नहारही दिला. दुसऱ्या दिवशी रत्नहार नाहीसा झालेला कळताच सगळीकडे चौकशी सुरू झाली आणि चोखामेळा जवळ तो हार सापडला. त्या वेळी पुजाऱ्यांनी त्याला खूप मारले. तेव्हा चमत्कार दाखवून देवाने चोखोबाचे रक्षण केले अशी कथा आहे.

संसारातील अडचणींनी चोखोबा रंजीस आला होता. आपल्या तप्त मनाला शांती मिळावी म्हणून, पुढे त्याने अनेक तीर्थयात्रा केल्या पण कुठेही त्याच्या मनाला शांती लाभली नाही. एका अभंगात चोखोबा म्हणतात- **बहुत हिंडलो देशदेशांतरा ।**
**परंतु मन नाही स्थीर झाले कोठे ।।**



**शेवटी पुनश्च पंढरीस आल्यावर ते सांगतात**
**चोखा म्हणे पाहता पंढरी भूवैकुंठ ।मनाचे हे कष्ट दूर झाले ।।**

अशा रीतीने पंढरीचे माहात्म्य व संतसमागमाची गोडी कळल्यावर चोखोबांनी पंढरीची वारी कधी चुकू दिली नाही. भक्तीसुखाचे जेवण जेवून सोयराबाईसह ते मग समाधानी वृत्तीने संसार चालवू लागले. शरीराने ते संसाराचा गाडा ओढीत खरे; परंतु त्यात ते कधीच गुरफटले नाही. उलट ते सर्वांनाच असा उपदेश करत, की, **टाळी वाजवावी गुढी उभारावी।**
**वाट ही चालावी पंढरीची ।।**

जातीने महार असले, तरी चोखोबाची राहणी फार स्वच्छ होती. ते कधीही मांसाहार करीत नसत. धूतवस्त्र परिधान करून ते पांडुरंगाच्या पूजेला बसत असत. पंढरपुरापासून काही अंतरावर मंगळवेढा नावाचे लहानसे गाव आहे. तिथे गावकूस घालण्यासाठी पुष्कळ लोक वेठीने कामास लावले होते. चोखोबाही त्यात होते. गावकूसाचे काम चालू असतानाच ते बांधकाम कोसळले, त्या खाली गाडले जाऊन चोखोबा मरण पावले. ही घटना इ.स. १३३८ मध्ये वैशाख वद्य पंचमीस झाली. नंतर आठ दिवसाने पांडुरंगाने पंढरीहून नामदेवाला चोखोबांच्या अस्थी आणण्यास पाठविले. ज्या अस्थीतून विठ्ठल विठ्ठल असा शब्द निघेल, त्या चोखोबांच्या अस्थी समज, अशी खूण विठ्ठलाने नामदेवाला सांगितली होती. नामदेवाने त्या अस्थी आणल्या आणि विठ्ठलाच्या महाद्वारी पुरून त्यावर समाधी बांधली. आजही पांडुरंगाच्या दर्शनाला जाताना प्रथम चोखोबाच्या समाधीचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. विठ्ठलाने त्यास आपला मानला होता. चोखोबाची भक्ती भगवंताने श्रेष्ठ ठरवली, विठ्ठल नेहमी त्यास सगुण रुपात दर्शन देत असे. त्यांच्या दुःखावर फुंकर घालत असल्याचे दाखले बऱ्याच जुन्या ग्रंथात पहावयास मिळतात.

कर्मकांडाच्या मागे न लागता ईश्वराचे नामस्मरण केले तरी परमात्मा प्रसन्न होऊन उध्दार केल्याशिवाय रहात नाही. असे संत चोखामेळा सांगतात. भक्तिप्रवण, आत्मनिष्ठ व्यक्तिमत्त्वाच्या चोखोबांच्या रचनांतून, त्यांच्या आंतरिक वेदनांचे सूर छेडलेले जाणवतात.

**खटनट यावे, शुद्ध होऊनी जावे।**
**दवंडी पिटीभावे डोळा।।**

असा पुकारा करून त्यांनी वारकरी संप्रदायातील अध्यात्मनिष्ठ, अभेद भक्तीचे लोण आपल्या उपेक्षित बांधवांपर्यंत नेऊन पोहोचवले.

आपल्या अभंगांतून चोखामेळाने विठ्ठलाविषयीचे प्रेम, त्याचे रूपवर्णन, गुणवर्णन यातून आपले विचार, आपला आनंद, आपले दुःख, आपल्या वेदना, आपल्या जाणिवा, आपल्या व्यथा समाजासमोर मांडल्या. अबिर गुलाल उधळित रंग, आम्हा नकळे ज्ञान, जोहार मायबाप जोहार, धाव घाली विठू आता, पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी, विठ्ठल विठ्ठल गजरी अवघी दुमदुमली पंढरी, सुखाचे जे सुख चंद्रभागे तटी, सुखाचे हे नाम आवडीने गावे असे अनेक सर्वांगसुंदर अभंग आजही स्वतंत्र अस्तित्व आपल्या मनावर बिंबवत आजही मोठ्या आवडीने म्हटल्या जातात. या अभंगांतून विठ्ठल भक्तीची चोखोबांच्या अंतरीत असलेली ओढ, विठ्ठलाचे सगुण साकार रूप व ते पाहण्यासाठी चोखोबांना झेलावे लागलेले अतोनात दुःख व विटंबना व्यक्त होतात. त्यांचे

चिरंतर विठ्ठल प्रेमाची आणि भक्तीची साक्ष देणाऱ्या संत चोखा मेळांच्या अभंगावरून त्यांचा पारमार्थिक अधिकार फार मोठा असल्याचे कळते. ते देहाला पंढरी आणि आत्म्याला विटेवरचा अविनाशी पांडुरंग मानतात. पिंडब्रम्हांडाचे तत्व त्यांच्या मनात पूर्णपणे ठसले होते. चोखोबांच्या अभंगाची रचना प्रवाही व अस्खलित आहे. त्यांच्या विचारांची उदात्तता आणि भाषाप्रभुत्व तर आश्चर्यकारक आहे.

आज दुर्दैवाने आपल्या समाजात जातीय अस्मिता जोपासल्या जात आहे आणि त्याला जाणीवपूर्वक खतपाणी घातल्या जात आहे. जाती जातीत तेढ निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाज एकसंघ, भेदविरहीत करण्यासाठी चोखोबांनी आपल्या जीवनातून आदर्श उभा केला आहे. समतेचे मानबिंदू असलेल्या चित्त, बुद्धी, अंतःकरणाने विठूमाऊलीशी एकरूप झालेल्या संत शिरोमणी चोखोबारायांना शत शत नमन !

# शक्ती-१ आण्विक क्षेपणास्त्र: यशस्वी चाचणी!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**देशभरात ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. तंत्रज्ञान हे मानवी संस्कृती घडवणाऱ्या घटकांत शासनव्यवस्था, समाजरचना, कर्म, तत्वज्ञान यांच्या इतकेच महत्व दिले आहे. तंत्रज्ञान हे मानवी सर्जनशील प्रज्ञेचे द्योतक आहे. तंत्रज्ञान विकसनामुळे मानवाचे जीवन अधिक सोयीस्कर बनत चालले आहे. पण हा दिवस आजच्या तारखेलाच का साजरा करतात? यासाठी अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा लेख... संपादक. आजच्या दिवशी- दि.११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे. अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली मोलाची कामगिरी केली. ती कामगिरी राजस्थान येथील भारतीय लष्कराच्या पोखरण चाचणी क्षेत्रातील होती.**

आधुनिक केसरी

त्यात शक्ती-१ या आण्विक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीपणे पार पाडली गेली. या प्रगतीचे प्रतीक ११ मे हा दिवस दरवर्षी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. याशिवाय याच काळात देशातच विकसित झालेल्या पहिल्या स्वदेशी विमान हंस-१ने पहिले उड्डाण बेंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे विमान नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीजने विकसित केले होते. तसेच कमी पल्ल्याचे, जलद- प्रतिक्रिया देणारे, जमिनीवरून हवेत मारा करणारे- एसएएम क्षेपणास्त्र- त्रिशूल हा भारतातील गाइडेड क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचा एक भाग होता. देशाच्या या प्रचंड यशानंतर भारताचे तत्कालीन माजी पंत्रप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून घोषित केला. भारतात सन १९९९पासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास मंडळ यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. दि.११ मे १९९८ रोजी भारतात यशस्वी अणुचाचणी घेण्यात आली होती. त्यानंतरच अण्वस्त्रे असलेल्या देशांच्या यादीत भारताचे नाव समाविष्ट झाले. भारताने ऑपरेशन शक्ती अंतर्गत राजस्थानच्या पोखरण येथे यशस्वी अणुचाचणी केली. त्यानंतर १३ मे रोजी दोन विभक्त चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यांचे नेतृत्व माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे. अब्दुल कलाम यांनी केले. त्यानंतर दि.११ मे १९९९ रोजी प्रथमच राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा करण्यात आला आणि तेव्हापासून हा दिवस दरवर्षी साजरा



केला जाऊ लागला. या दिवसाची घोषणा तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी केली होती.

या दिवसापासून आजपर्यंत तंत्रज्ञान विकास मंडळाने तांत्रिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल शास्त्रज्ञ व अभियंत्यांना सन्मान व प्रोत्साहन दिले आहे. वैज्ञानिक, डीआरडीओ- संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, भाभा अणुसंशोधन केंद्र- बीएआरसी आणि एएमडीईआर- अणू खनिज संचालनालय अन्वेषण आणि संशोधन यांनी यशस्वीरीत्या चाचणी केली. हेच कारण होते ज्यामुळे भारत थर्मोन्यूक्लियर शस्त्रे तयार करण्यास सक्षम बनू शकला. आज नॅशनल टेक्नोलॉजी डे- राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून भारतासाठी आजचा दिवस खास आहे. हा दिवस भारतासाठी अनेक कारणांमुळे विशेष आहे. वरीलप्रमाणे एक अतिशय रंजक इतिहास यामागे दडलेला आहे. दरवर्षी ११ मे रोजी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा केला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे योगदान आणि या क्षेत्रात भारताने केलेल्या अतुलनीय कामगिरीची साक्ष देणारा हा दिवस म्हणावा लागेल. दरवर्षी याच दिवशी उत्साहात साजरा केला जातो. तसेच राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनाच्या दिवशी हंस-१ या पहिल्या भारतीय विमानाने यशस्वी भरारी घेतली होती.

त्याशिवाय डीआरडीओने याच दिवशी त्रिशूल क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणीही केली. हे एक क्षेपणास्त्र आहे जे त्याच्या लक्ष्यावर वेगाने हल्ला करते. हा इतिहास कायम स्मरणात रहावा आणि भारतीय युवापीढी या दिवसाची सदोदित प्रेरणा घेत रहावी. म्हणून हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो, हे विशेष येथे उल्लेखनीय!

# जीवन हितार्थ राग हा पाळता आला पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**राग येणं वाईट नाही त्याच व्यवस्थापन व्यवस्थित करता आलं पाहिजे. जीवनाच हित करायचा असेल तर आपल्या आयुष्यात आपल्याला राग हा पाळता आलाच पाहिजे अथवा तो पाळायला शिकल पाहिजे. आपल्या मनात उत्पन्न झालेल्या रागाल आपण ज्या पद्धतीने खतपाणी घालतो तशा पद्धतीने त्याचे फलस्वरूप परिणाम अपेक्षित असतात. खातपाणी घलताना गडबड झाली तर मग आपल्या हातुन अनपेक्षित अहितकारक घटना घडुन जातात. पण खतपाणी योग्य म्हणजे ज्ञान विवेक राग यांचं एकत्र चिंतन मंथन केले तर त्या रागातुन सुद्धा सकारात्मक योग्य परिणाम समोर येतात हितकारक बाबी घडतात.**


आधुनिक केसरी

जीवन म्हटलं की बहुतांश घटना घडामोडी ह्या आपल्या मना विरुद्ध घडत असतात. तसच आपल्या आजूबाजूला असणारी भौतिक परिघातील माणसं हि कधी कधी भौतिक स्वार्थ व मोहापायी तर कधी त्यांच्या स्वतःच्या सद्सद्विवेक बुद्धी नुसार आपल्या मनाविरुद्ध अचारण करत असतात. हे सगळं पाहून आपण क्रोधित होतो आपल्याला राग येतो. मुळात प्रत्येकाचं संचित कर्म वेगळं आहे जो तो आपल्या संचित कर्मा नुसार आपल आचरण करणारच या मध्ये बदल होऊ शकत नाही हे वास्तव आहे पण हेच वास्तव आपल्याला अनेकदा पटत नाही. मग आपल्या मनात राग उत्पन्न होतो इथं पर्यंत सगळं ठिक आहे. पण आपल्या मानत उत्पन्न झालेला राग हा आपल्याला पाळता आला संयमित स्थिर करता आला पाहिजे. आणि त्याचे सकारात्मक योग्य परिणाम निर्माण करता आले पाहिजे. राग येत नाही अथवा येणार नाही असा कोणीही व्यक्ती शोधून पृथ्वी वर सापडणार नाही. पण राग आल्यावर पुढे काय हे फार महत्त्वाचे आहे. राग येणं हा मानवी स्वभावाचा एक अविभाज्य भाग आहे. पण राग आल्यावर हा राग आपला विवेक नष्ट करणार नाही याची काळजी दक्षता घेतली गेली तरच आपलं हित होईल. अन्यथा राग हा कधी आपलं जीवन उद्ध्वस्त करेल हे आपल्याला पण कळणार नाही. म्हणून आयुष्य उध्वस्त होऊ देयच नसेल तर राग पाळता आलाच पाहिजे. राग हि एक प्रकारची शरीरातील उर्जा आहे हि उर्जा अधुन मधुन जागृत होणारच पण जेव्हा हि उर्जा जागृत होईल तेव्हा विनाश अथवा हित या पैकी एक घटना निश्चित असते. मग आपण आपला विवेक आपलं ज्ञान अज्ञान या नुसार कोणती गोष्ट स्वीकारतो हे महत्वाचं आहे. आपण राग पाळला तर नक्कीच आपल हितच होईल आणि राग जर पाळला नाही तर आपलं अहित होईल हे निश्चित आहे. मानवी जीवनात अगदी लहान मुलांपासून ते अगदी तरूण तसंच वृद्ध म्हणजे प्रत्त्येक वयोगटातील व्यक्तींना राग हा आपला शिकारी बनतोच पण आपण सावध असलं पाहिजे .शिकारी किती प्रभावी असला तरी आपण आपला बचाव करण्यासाठी सक्षम असलं पाहिजे. रागा पासुन कोणीही सुटलेलं नाही. दैनदिन दिनक्रम आणि त्या अनुषंगाने निगडित बाबी त्या मुळे ताण तणाव निर्माण होण राग येणं हे सगळं नैसर्गिक असुन कधी कधी स्वतःचा तर कधी इतरांचा येतो. पण हाच राग कल्याण कारी सिद्ध करायचा असेल तर तो पाळायला शिकलं पाहिजे. राग पाळण्यासाठी आपल्या ज्ञान कक्षा रुंदावल्या पाहिजेत विवेक सदैव जागृत ठेवला पाहिजे सदैव ज्ञान सदृश परिस्थितीत असलं पाहिजे सकारात्मक वातावरण ठेवलं पाहिजे सकारात्मक विचारसरणी जोपासली पाहिजे. रागाच्या उर्जेचा वेग हा योग्य आणि हितकारक कार्यासाठी वापरला पाहिजे. जीवनात संयम शांतता हि खुप महत्वाची असते. या सगळ्या पेक्षाही ज्ञान पुर्ण विवेक जागृत असला पाहिजे. प्रत्येक बाब हि ज्ञान सदृश बाबींशी सुसंगत पाहता आली पाहिजे. ज्ञान आणि राग एकत्र राहु शकत नाहीत म्हणून सदैव ज्ञान मार्गावर असल पाहिजे जेणेकरून संयोगवश निर्माण झालेला राग आपलं फार काही नुकसान करू शकणार नाही. मनात राग पाळा आणि ज्ञान वाढवा जेणेकरून राग आपोआप संपुष्टात येईल अथवा सकारात्मक उर्जेत त्याच रूपांतर होईल. जीवनातील हितार्थ राग पाळता आलाच पाहिजे.

# तहसीलदार काकडे: सर्वसामान्यांचा अधिकारी

आधुनिक केसरी

**काबिल दोस्तो का होना भी शायद तकदिर होती है... बहुत लोगो के हाथो मे ये लकीर होती है... ३६५१ किमी ची रेड ॲक्रोस इंडिया तर्फे आयोजित सायकलिंग स्पर्धा.ह्या स्पर्धेत नोंदणी संपायच्या आठ दिवस अगोदर एक राजपत्रित अधिकारी आपले नाव नोंदवतो.ना कुठली पूर्व तयारी,ना एव्हड्या लंब्या टप्प्याची कधी सायकलिंग केलेली, ना त्याबाबतचा कधी साधा विचारही केलेला. नाव नोंदविल्या जाते, आणि नंतर सुरू होते टीम चि तयारी.टीम ऑफ फोरम मध्ये नोंदणी केल्या नंतर चमुचा शोध सुरू होतो.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

मग त्यात केशव निकम हा पोलीस कर्मचारी,आशिष बोरकर सायकल मेकॅनिक, महाविद्यालयीन विद्यार्थी कृष्णा मोहोकार, सोबती केअर टेकर म्हणून काही प्रवासापूरते मेहकर येथील तलाठी मुकेश काळे, सोबतीला गोपाल ठोकळ अशी सगळी लगान टीम तयार करून श्रीनगर ते कन्याकुमारी असा ३६५१ किलो मीटर च्या प्रवासासाठी हा राजपत्रित अधिकारी अवघ्या ८ दिवसाच्या तयारीने स्पर्धेत उतरला आणि २,३ दिवसाच्या ८,९ तासात २०० ते २२५ किमी चे अंतर पार करत सहा दिवस आणि १३ तासात ही स्पर्धा पूर्ण केली. ही स्पर्धा पूर्ण करणारा अधिकारी म्हणजे सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावर 'संतोष' आणणारे अमरावती चे तहसीलदार संतोष काकडे.

पत्रकारितेच्या क्षेत्रात असल्याने अनेक अधिकाऱ्यांशी माझे सबंध आलेत.अधिकारी आणि माझे तसे चांगलेच सुत.माझे आणि अधिकाऱ्यांशी नेहमीच सबंध चांगलेच राहले आहेत.कुठलाही अधिकारी कुठेही जरी बदलून गेले तरीही, माझ्याविषयीच्या त्यांच्या भावना आणि माझ्याविषयी चा आदर उलट द्विगुणित झालेला मी अनुभवलेला आहे.त्याला कारण ही तसेच आहे. कुठल्याही अधिकाऱ्याकडे कधीच माझे वैयक्तिक काम राहत नाही,ना मी कधी अधिकारी वर्गाकडून कुठली अपेक्षा व्यक्त केली. स्वार्थविरहित पवित्र ऋणानुबंध जपत असतांना त्यांना योग्य तो सल्ला देणे,त्यांना सहकार्य करणे आणि त्यांच्या पदांचा सर्वसामान्य लोकांसाठी उपयोग करणे.

माझ्या पत्रकारितेच्या आणि सार्वजनिक जीवनात अनेक अधिकारी यांच्याशी माझे ऋणानुबंध जुळले त्यातील एक अधिकारी म्हणजे सध्या अमरावती येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असणारे संतोष काकडे. संतोष काकडे हे मेहकर येथे तहसीलदार म्हणून रुजू होण्यापूर्वीच सिंदखेडराजा आणि देऊळगाव राजा येथील अनेक मित्रांचे मला कॉल आले. आमचे अतिशय जवळचे असणारे काकडे साहेब आपल्या मेहकर शहरात तहसीलदार म्हणून रुजू होत असल्याचे त्यांनी सांगितले. आणि नक्कीच हा माणूस 'काबिल ए दोस्ताना' असल्याचे जाणवले. जिद्द आणि चिकाटी कशी असावी याचे उदाहरण म्हणून तहसीलदार काकडे यांच्याकडे बघता येईल.हा माणूस जिथे जातो तिथे आपला गोतावळा निर्माण करतो, ही खरी या माणसाची खासियत आहे.यवतमाळ जिल्ह्यानंतर बुलडाणा जिल्ह्यात मातृतीर्थ सिंदखेडराजा,देऊळगाव राजा आणि



नंतर मेहकर याठिकाणी आपला गोतावळा निर्माण केल्यानंतर अमरावती येथे या माणसाने स्वतःच्याच आयुष्याला कलाटणी देऊन टाकली. अमरावती शहरात हनुमान व्यायाम शाळा.इथे फिटनेस कडे लक्ष देण्याचा कल.त्यामुळे सायकलिंग चा एक ग्रुपच ॲक्टिव्ह आहे.अमरावती सायकलिंग असोसिएशन ह्या ग्रुपला ना वयाची मर्यादा ना कुठला धर्म कधी ह्या ग्रुपच्या आड आला.सायकलिंग च्या माध्यमातून तंदुरुस्ती ला प्राधान्य देत खराखुरा मानसिक आनंद मिळविण्याचे काम अमरावती येथील हा ग्रुप करत असतो.माणुसकी आणि माणसाचे वेड असणारे काकडे याकडे आकर्षिले गेले नसते तर नवलच ! अमरावतीसारख्या मोठया शहरात तहसीलदार म्हणून काम करत असतांना ह्या व्यापातून निखळ आनंदासाठी आणि शरीरासाठी वेळ काढत संतोष काकडे यांनी हा ग्रुप जॉईन केला. केवळग्रुप जॉईन न करता ह्या माणसाने सायकलिंग मधील अतिशय मानाचा एस.आर. [ super Rondonneur ] हा किताब गतवर्षी अर्थात 2022 ला पटकावला. हा किताब मिळविला म्हणजे थांबायचं हे त्यांच्या स्वभावात नाही.आगामी काळात पोहणे,सायकलिंगआणि धावणे अशा त्रिस्तरीय आव्हानाचा समावेश असलेली आयर्नमॅन स्पर्धा, तसेच जगातील लंडन, बलिन, टोकियो,शिकागो,न्यूयॉर्क,बोस्टन या सर्वोच्च फुल मॅरेथॉन (42.2) ,पूर्ण करण्याचा त्यांचा मांस आहे. तसेच Race Across America (RAAM) या सायकलिंग स्पर्धेत देखील त्यांना सहभागी व्हायचे आहे. जे ठरवले ते पूर्ण करण्याचा त्यांचा जिद्दी स्वभाव असल्याने यात देखील ते यशस्वी होतीलच हा विश्वास आहे.संतोष काकडे यांचे आई वडील,भाऊ आणि वहिनी शिक्षकी पेशातील. संतोष काकडे हे कृषी सहायक म्हणून नोकरीला लागले आणि नंतर देखील स्वस्थ न बसता २००७ च्या महाराष्ट्र लोकसेवाआयोगाची परीक्षा देऊन नायब तहसीलदार आणि आता तहसीलदार म्हणूनकार्यरत आहे.

पती पत्नी दोघेही कृषी सहाय्यक म्हणून नोकरीला लागले. लग्नानंतर देखील आपली जिद्द कायम ठेवत राजपत्रित अधिकारी झालेल्या या अवलिया माणसाने सर्व सामान्य लोकांना कधी निराश होऊन परत पाठवले नाही. अधिकारी म्हणून वावरत असतांना होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी आपले चंदनाचे हात पुढे केले तर ज्या मातीतून आपण आलो त्या गावाला देखील ते कधी विसरले नाहीत.सर्वांच्या आयुष्यात गोडवा निर्माण करणाऱ्या काकडे साहेबांना त्यांच्या जिद्दी प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा

त्यांच्या जिद्दी साठी एकच म्हणता येईल..

जीद चाहीये जितने के लीये,हारने के लीये तो एक डर ही काफी है

# अवकाळी पावसामुळे बळीराजा संकटात सापडला !



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**एका काळी पावसाळ्यात पाऊस पडायचा, हिवाळ्यात कडक थंडी पडायची अन् उन्हाळ्यात अतिशय कडक ऊन पडायचे.त्या काळी मात्र लोकांचे जगणे हे, वेगळेच होते भलाही त्यांची परिस्थिती नाजूक होती पण, कसेतरी ते,जगायचे समाधानी रहायचे कारण, त्याकाळी निसर्गाचे संतुलन बिघडत नव्हते, प्रदूषणात वाढ होत नव्हती, सर्वामध्ये थोडीफार तरी माणुसकी जिवंत होती व आपुलकी होती पण, आताच्या सध्याच्या परिस्थितीत बघितले तर मात्र जमीन आसमानचा फरक जाणवताना दिसत आहे. म्हणूनच कदाचित निसर्गानेही आपले रुप बदलवले असावेत. आज ह्या अवकाळी पावसामुळे बळीराजा हतास झालेला आहे. शेतात धान, मका व इतर पीक चांगल्याप्रकारे बहरून येताच ऐन तोडांवर आलेला घास अवकाळी पाऊस हिसकावून नेत आहे.**

आधुनिक केसरी

हा घोर कलियुग आहे असे बरेचजण म्हणत असतात पण,बळीराजाच्याच जीवनात का म्हणून. ..? आज तो जगाचा पोशिंदा म्हटला गेलेला आहे पण, आज अशी भयंकर परिस्थिती त्याच्या जीवनात आली असेल तर तो जगाला पोसणार तरी कसा. ..? या अवकाळी पावसाचा फटका अनेकांना पडला असेल.. पण, सर्वात जास्त नुकसान आज बळीराजाच होत आहे. हि परिस्थिती कोणी बघावे..? कोणी आपुलकीने मदत करावी. काही लोक म्हणतात की, बळीराजाने नुसता पीकाला पाणी दिलं तरी पीक निघत असतो त्यांना काय माहीत की बळीराजा कसा जगतो आणि कोणत्या परिस्थितीतून निघत आहे.म्हणणे, बोलणे सोपे असते पण, सत्य जाणून मदतीला धावून जाणे तेवढेच कठीण काम असते कारण, ते सर्व करण्यासाठी माणसात काळीच असावे लागते पण,त्या प्रकारचे सर्वाकडे काळीज असेलच असे नाही .माहीत नाही म्हणूनच आज याच समाजात राहणारे बळीराजाला संकटात पाहून आपुलकीने मदत करायची सोडून घरबसल्या मस्तपैकी आनंद घेत आहेत.

उलट तेच म्हणतात की, आलेली परिस्थिती बघून बळीराजा का.. आंदोलन करत नाही. पण,त्याने का म्हणून आंदोलन करावे..? बळीराजावर आलेले संकट पाहून सर्वजण एकत्र येऊन आंदोलन करायला पाहिजे. होऊ शकेल तर.. माणुसकी च्या नात्याने आपल्या वेतनातून थोडे पैसे त्याच्या खात्यात जमा करण्यासाठी शासना पर्यंत हि बातमी पोहोचवायला पाहिजे पण,तसं काहीही होताना दिसत नाही. फक्त, जो,तो,आपल्या भाषणात मोठ्याने म्हणतो "जय, जवान जय किसान" आता कुठे गेली बळीराजा विषयी आपुलकी. . ? आणि नारे...? कारण, हा जमाना स्वार्थी झालेला आहे. बळीराजावर एवढे संकट आलेले पाहून सुद्धा या समाजात राहणारा एकही व्यक्ती आपुलकी च्या नात्याने मदत करतांना दिसत नाही. आजकाल फेसबुकवर नको त्या बातम्या दररोज बघायला मिळत असतात पण, बळीराजाच्या शेतावर या अवकाळी पावसामुळे पीकाची किती नासाडी झाली आहे हे, जगाला दाखविण्यासाठी कोणाकडेही वेळ नाही. हि फार मोठी शोकांतिका आहे. आज याच अवकाळी पावसामुळे, गारपीटीमुळे,जोरात आलेल्या हव्यामुळे मक्याच्या दाण्याला कोंब फुटले आहेत, धान जमीनदोस्त झाला आणि इतर पीक सडून गेले आहेत एवढे सारे भंयकर संकट तेही गोर, गरीब, बळीराजा यांच्या वाट्याला आलेले आहेत. कित्येक लोकांची घरे पडलेली आहेत, कोणी बेघर झाले आहेत तर..कोणी वीज पडल्यामुळे मृत्यूमुखी पडले आहेत . कोणाच्या शेळ्या, मेंढ्या, गाई,मैस्ह सुध्दा मृत्यूमुखी पडले आहेत या अशा भयानक परिस्थितीने पूर्णपणे सिमा गाठली आहे. म्हणून आज बळीराजा चिंतेत पडला आहे.

# भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी


**जगाच्या पाठीवर '२०५ पेक्षा जास्त देश' आहेत. पण या सर्व देशांचा आणि त्यांच्या राज्यकारभारांचा अभ्यास जेव्हा तुम्ही-आम्ही करायला सुरुवात करतो, तेव्हा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचा प्रचंड अभ्यास आणि दूरदृष्टीचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. एक अतिशय 'वैशिष्ट्यपूर्ण' असं लिखित 'संविधान' ह्या खंडप्राय आणि प्रचंड विविधता असलेल्या आपल्या देशाला लाभलेले आहे. भारतीय राज्यघटनेची महत्वाची 'वैशिष्ट्ये' पुढीलप्रमाणे आहेत:-**

**१) भारतीय राज्यघटना ही लिखित आणि विस्तृत स्वरुपात आहे:**

भारतीय राज्यघटना ही केवळ लिखितच नाही, तर अतिशय विस्तृत स्वरुपात आहे. जगातील कोणत्याही देशाच्या राज्यघटनेपेक्षा भारताची राज्यघटना ही सर्वात मोठी आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेत केवळ ७ अनुच्छेद आहेत. कॅनडा-१४७, चीन-१३८ तर ऑस्ट्रेलिया-१२८ अनुच्छेद आहेत. ह्या सर्व देशांशी तुलना करता आपल्या राज्यघटनेत सुरवातीला '२२ भाग, ३९५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टे' होती. आज भारतीय राज्यघटनेत '२५ भाग, ४६१ अनुच्छेद (जानेवारी २०१९ पर्यंत) आणि १२ अनुसूच्या' आहेत. आणि म्हणुनच जगातली सर्वात मोठी राज्यघटना म्हणून सन्मान आपल्याच राज्यघटनेला मिळतो.

**२) प्रचंड अभ्यास आणि विविध स्त्रोतांपासून निर्मित :-**

भारतीय राज्यघटना ही प्रचंड अभ्यासातून आणि विविध स्त्रोतांपासून निर्माण करण्यात आलेली आहे. घटनाकारांनी जगातील सुमारे '६० देशांच्या राज्यघटनांचा' अभ्यास करून त्यांतील महत्त्वाच्या तरतुदींचा भारताच्या राज्यघटनेत समावेश केलेला आहे. तसेच घटनाकारांनी भारतीय समाज, जात, धर्म आणि परंपराचा देखील अभ्यास केलेला आहे. राज्यघटनेवर '१९३५ च्या कायद्याचा' प्रभाव दिसून येतो. या कायद्यातील सुमारे '२५० तरतुदी' घटनेत घेण्यात आलेल्या आहेत. ह्या 'भारत सरकार कायदा १९३५' वर बाबासाहेबांच्या विचारांचा आणि दृष्टिकोनाचा खुप मोठा प्रभाव होता. प्रामुख्याने 'अमेरिकन' राज्यघटनेवरुन 'मुलभूत हक्क' आणि 'न्यायालयिन पुनर्विलोकन' या बाबींचा समावेश, 'आयर्लंडच्या' राज्यघटनेवरुन 'मार्गदर्शन तत्त्वांचा' स्विकार करण्यात आला आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या 'भगवान गोतम बुद्धांच्या' शिकवणुकीचा देखील प्रभाव आणि स्वातंत्र्यपूर्व काळात झालेल्या कित्येक 'सामाजिक चळवळींचा' देखील प्रभाव आपल्या संविधानावर आहे आणि म्हणुनच ते सर्वसमावेशक आणि सर्वांच्या आदरास पात्र असे आहे.




**३) अंशतः लवचिक आणि अंशतः ताठरः--**

काळानुरूप बदलत जाणारी परिस्थिती व गरजेनुसार घटनादुरुस्तीची प्रक्रिया, ही सर्वसामान्य बाबींसाठी पुरेशी 'लवचिक' आणि महत्त्वाच्या बाबींसाठी पुरेशी 'ताठर' आहे. त्याचा योग्य मेळ राज्यघटनेत घालण्यात आलेला आहे. जगाशी तुलना करता 'अमेरिकन राज्यघटना' ही खुप ताठर, तर 'ब्रिटिश राज्यघटना' ही खूप लवचिक आहे. भारतीय राज्यघटनेतील 'अनुच्छेद-३६८' हे 'घटनादुरुस्तीचे अनुच्छेद' आहे. योग्य ती प्रक्रिया पार पाडून आणि संविधानाच्या मुलभूत गाभ्यात कुठलाही बदल न करण्याचे बंधन पाळून, संविधानात आवश्यक त्या 'दुरुस्त्या' करण्याची तरतूद ह्या अनुच्छेदामध्ये आहे. हे वैशिष्ट्य खुप महत्वाचे आहे, कारण ब्रिटिशांच्या अगोदर भारतात राजे-रजवाडे, सुलतान, बादशहा, संस्थानिक, वतनदार यांचे राज्य होते. आणि हे सर्व आपापल्या पुरोहितांच्या मान्यतेने राज्यकारभार करत. समाजजीवनावर पुरोहितशाहीतून आलेल्या धर्म संकल्पना आणि परंपराचा प्रभाव होता. त्यामुळे कितीही परिस्थिती वा काळ बदलला, तरी त्यात बदल संभव नव्हता, याचा प्रत्यय आज देखील आपणा सर्वांना येतो. आणि म्हणुनच 'अनुच्छेद-३६८' हे खुप महत्त्वपूर्ण अनुच्छेद आहे.

# शरीराचा कणा अस्थि धातू

शरीराचा कणा अस्थिधातू शरीराचे धारण करणारा रक्षण करणारा सर्वात कठीणतम धातू म्हणजे अस्थिधातू आहे, शरीराचा साचा हाडांनी बनलेला असतो ज्यावर मांसपेशी, स्नायू, चिकटलेले असतात. अस्थिधातू इतर अवयवांचे रक्षण करतो. अस्थिधातूशी संबंधित अन्य तीन महत्त्वाचे शरीर घटक म्हणजे दात, नख, केस. अस्थिधातू मजबूत असेल तर हे घटकही निरोगी राहतात, सांध्यांचे आरोग्य ही प्रामुख्याने अस्थिधातूवरच अवलंबून, असते एकंदरीत शरीराची स्थिरता, हालचाली, उंची, ठेवण या सर्व गोष्टी अस्थिधातूवरच अवलंबून असतात त्यामुळे सुरुवातीपासूनच अस्थिधातू मजबूत होण्यासाठी योग्य प्रयत्न करायला हवेत.पृथ्वी, अग्नी आणि वायू या तिघांचे एकत्र पचन होऊन कठीण असे अस्थिधातू निर्माण होतात. म्हणूनच अस्थिधातू कठीण असले तरी त्यांच्यात पोकळी ही असते ही पोकळी सामान्य स्वरूपात असणे आवश्यक असते पण वातदोष वाढला तर ती पोकळी मोठी होते त्याच्या परिणाम स्वरूपी हाडे ठिसूळ व्हायला लागतात, यालाच ऑस्टिओपोरोसिस असेही म्हणतात. यामध्ये हाडे मोडण्याची शक्यता वाढते आणि स्थिरता कमी झाल्याने अशक्तता येते. आतापर्यंत आपण अस्थिधातूची उत्पत्ती उपयोगिता पाहिली आता अस्थिमध्ये अशक्तता किंवा व्याधी उत्पन्न होण्याची कारणे पाहू



(१)अति प्रमाणात व्यायाम केल्याने अस्थिधातूमध्ये वात वृद्धी होऊन व्याधी उत्पन्न होऊ शकतात.
(२)अति मानसिक शोध
(३)वातवर्धक म्हणजे शिळे अन्न रुक्ष आहार करणे अस्थिधातूमध्ये दोष उत्पन्न होतात, वरीलपैकी कोणत्याही कारणाने अस्थिधातूत दोष उत्पन्न झाल्यास खालील लक्षणे आढळतात जसे की केस गळणे शरीरात कोरडेपणा वाढणे फारसे श्रम न करताही थकवा येणे, नखे आणि दात तुटणे, सर्वसांधे गळून गेल्यासारखे वाटणे, हाडांमध्ये टोचल्यासारखे वाटणे, मणक्यांची झीज होणे, गुडघे झिजणे सांधेदुखी, पाठदुखी हाता पायांचे बोट वेडी वाकडी होणे, आदि लक्षणे दिसतात.

आता सामान्यपणे अस्थिधातूचे ठिकाणी विकृती उत्पन्न होऊ नये किंवा झाल्यास त्यावरील औषधोपचार खालिल प्रमाणे केले जातात सर्वप्रथम अस्थिधातूंची काळजी ही मातेच्या गर्भावस्थेपासूनच केली गेली पाहिजे त्यामुळे गर्भावस्थेमध्ये मातेने दूध, खारीक, खसखस, आदि कॅल्शियमयुक्त पदार्थांचे सेवन अति प्रमाणात करावे. दूध हे अस्थिधातूसाठी सर्वोत्तम मानले आहे. घरातील लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनी अवश्य दूध प्यावे. याशिवाय ताक, लोणी, खारीक, बाभळीचा डिंक, तुपात भाजून खाणे खसखस, बदाम, अक्रोड ओले नारळ, मूग, मटकी आदी कडधान्ये अस्थिधातूसाठी पोषक असतात. औषधींचा विचार करायचा झाल्यास प्रवाळपिष्टि कुक्कुटाणत्वकभस्म, अस्थि मज्जा पाचक योग शौकिक भस्म, मौतिक भस्म, अर्जुन चूर्ण आदी औषधी योग्य डॉक्टरांच्या सल्ल्याने उपयोगी पडू शकतात .

पंचकर्मांचा विचार करायचा झाल्यास वात हा अस्थिधातूच्या आश्रयाने राहतो म्हणजेच वातदोष स्थिर ठेवला गेल्यास अस्थिधातूची ही पोषण होते, त्यासाठी औषधी सिद्ध तेलाने अभ्यंग म्हणजेच मसाज करणे उत्तम असते. त्याच सोबत योग बस्ती म्हणजेच काढ्याचा बस्ती, तेलाचा बस्ती, तिक्तक्षीर बस्ती म्हणजेच दुधापासून तयार केलेले बस्ती या सगळ्या गोष्टी हाडांची मजबुती वाढवण्यास व टिकवण्यास आणि विकृती निर्माण झाल्यास ती दूर करण्यास उपयोगी पडतात, वरील सर्व औषधी पंचकर्म व आहाराचा सल्ला हा योग्य वैद्यांच्या सल्ल्याने घेतल्यास अधिक उपयोगी पडू शकतात व शरीराचा कणा व कठीण धातू असा अस्थिधातू हा निरोगी ठेवण्यास मदत होते.



**डॉ. अभिजीत भा. सावळे**
**एम डी (आयुर्वेद) संपर्क : ७५८८८१८५०५**

# आयुर्वेदिक वनस्पती व उपचार

भुक वाढवते , पचन क्रिया सुधारक, पचायला हलकी,त्वचा रोग कमिकरते 1- कोबी मधुमेहाच्या रुग्णमधील ग्लुकोजची पातळी कमी राखंन्यास साह्यक आहे. 2- हायपोथायरॉईडीझमच्या रुग्णांनी कोबी खाऊ नये. 3- मधुमेह, लठ्ठपणा, हृदयविकार अल्झायमर यांसारख्या आजारांचा धोकाही कमी होतो. 4- कोबी मधे व्हिटॅमिन के, आयोडीन आणि अँथोसायनिन यांसारख्या अँटिऑक्सिडंट्स अधिक असतात. हे घटक मेंदूसाठी फायदेशीर असतात.

5- कोबीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते आठवड्यातून एकदा पत्ता कोबी अवश्य खावी किडनी चे आजार, मुतखडा, थायरॉईड यामद्ये कोबी वर्ज आहे. दालचीनी चे फायदे दालचिनीचे झाड सदाहरित आणि छोट्या झुडूपासारखे असते.पूर्ण वाढलेले झाड ६ ते १५ मी.उंचीचे असते.त्याच्या खोडाची साल निवडून घेऊन वाळवतात.त्यांचा आकार कौलासारखा गोल,जाड,मऊ आणि तांबूस रंगाचा असतो. दालचिनीची पैदास कोणत्याही प्रकारच्या जमिनीत होऊ शकत असल्याने अत्यंत सुपीक जमिनीपासून मुरुमाड, रेताड जमिनीत दालचिनी पिकते. दालचिनी हे बागायती पिक असले तरीदेखील समुद्र सपाटी पासून १००० मी.उंचीवर हे पिक कोठेही घेतले जाते. दालचीनिला सुगंध असतो.यांचा वापर सर्वत्र मसाल्याचा पदार्थ आणि औषधी म्हणून करतात.याचे तेल ही काढले जाते.दालचिनीची पाने देखील 'तेजपत्र' म्हणून मसाल्यात वापरतात. दालचिनी चवीला तिखट-गोड असते. दालचिनी उष्ण, दीपन, पाचक, मुत्रल, कफनाशक, स्तंभक गुणधर्माची आहे.मनाची अस्वस्थता कमी करते.यकृताचे (Liver) कार्य सुधारणा करते.स्मरणशक्ती (Memory) वाढवते. दालचिनीचे उष्मांक मूल्य ३५५ आहे.

पचन विकार | Digestive disorders सर्दीसाठी | Cough and cold
स्त्रीरोग | Gynaecological benefis
स्वयंपाकाची लज्जत वाढवण्यासाठी | Adding flavor to food

आल्याचे फायदे आल्याच्या लागवडीसाठी उष्ण आणि दमट हवामानाची गरज असते, त्यामुळे उष्ण कटीबंधात सर्वत्र त्याची लागवड होते.ते खरिफ तसेच रब्बी हंगामात येते. याला पाण्याची फारशी गरज लागत नाही. मुरुमाड,ठिसूळ आणि वालुकामय शेतजमिनीमध्ये आले उगवू शकते. परंतु चांगले उत्पादन येण्यासाठी एकाच जमिनीत सातत्याने आले न लावता जमीन आलटून,पालटून आल्याची शेती करावी. जगभर आल्याचा उपयोग मसाल्याचा पदार्थ आणि औषधी म्हणून होतो.आल्याला 'महा औषधी' म्हणतात,यावरूनच त्याचे औषधी परिणाम ध्यानात येतात. आले हे अडीच-तीन फुट वाढणाऱ्या झुडुपाची, जमिनीखाली उगवणारी, पिवळ्या रंगाची मुळी होय. आले दीर्घकाळ टिकण्यासाठी उन्हात तसेच काही ठिकाणी दुधात बुडवून वाळवून त्याची सुंठ बनवतात. सुंठ आल्यापेक्षा उग्र असते.सुंठीचे तेल काढतात. ओल्या मातीत ठेऊन आले बराच काल टिकते.

पचन विकार | Digestive Disorders
श्वसन विकार | Respiratory disorder
स्त्री रोग | Gynecological problems
वेदना शमन | Pain killer

दही खाण्याचे फायदे थंड आणि मधुर दही कोणाला आवडत नाही ? दही कशा सोबतही खा - त्याची चव वाढवतेच. दही फक्त आहाराची लज्जतच वाढवत नाही तर आरोग्यही प्रदान करते.्हणून तर सर्व आहार तज्ञांची यादी दह्याशिवाय सुरु आणि पूर्ण होत नाही. सर्वच प्राण्यांचे दुध आणि दुग्धजन्य पदार्थ पौष्टिक आहेत, परंतु या पौष्टीकतेमध्ये दह्याचा क्रमांक वरचा लागतो कारण दह्यासोबत खाल्लेले अन्न सहज पचते आणि त्या अन्नातील जीवनसत्वे आणि प्रथिने सहजरीत्या रक्तात आणि शरीरात शोषली जातात. म्हणून दह्याला 'परिपूर्ण आहार' म्हणून सर्वत्र मान्यता आहे. पोट 'भरल्याचे' समाधान टिकून राहते भरपूर प्रथिनांनी युक्त आहार ऊर्जेने युक्त आहार प्रतिकारशक्ती वाढते मधुमेह नियंत्रित राहतो पचन क्रिया सुधारते हृदय विकाराची शक्यता कमी होते जीवनसत्वानी परिपूर्ण आतड्यांचे आरोग्य सुधारते चेहरा,त्वचा उजळते केसांसाठी उपयुक्त मानसिक स्वास्थ्यासाठी ल सणाचे ५ औषधी गुणधर्म लसणाचे झुडूप २-३ फुट वाढते,खोड घट्ट,पाने अरुंद आणि चपटी असतात. या वनस्पतीच्या मुळाला लसूण कंद म्हणतात.या कंदावर पांढरे आणि पारदर्शक आवरण असते. लसणाच्या लागवडीसाठी सुपीक,भुसभुशीत आणि पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीची गरज असते. त्यामुळे तिचे कंद चांगले पोसवतात आणि लसूण काढणे सोपे जाते. अति उष्ण लसणाचे कंद पोसवत नाहीत.याच्या लागवडीसाठी पाण्याची खूप गरज असते.हे बागायती पिक आहे.पाण्याची सोय असल्यास हे बारमाही पिक घेता येते.लसूण थंड आणि कोरड्या हवामानात वाढतो.



डांग्या खोकला,रक्त दोष,घटसर्प,बहिरेपणा,कुष्ठ रोग,संधिवात,मुळव्याध,यकृताचे आणि पित्ताशयाचे विकार इ.वर लसूण गुणकारी आहे.
कामोत्तेजना कमी होणे, संभोग शक्ती क्षीण झाल्यास लसणाचा उपयोग होतो.
श्वसन दोष, दमा | Asthma and respiratory disease
पचन विकार | Digestive disorder
उच्च रक्त दाब |High blood pressure
हृदय रोग | Heart trouble
कर्करोग | Cancer त्वचा विकार | Skin disease.

**डॉ. मनोज जोशी मो. 9822341176**
**श्रीराम आयुर्वेदालय.**

# शरीराचा कणा अस्थि धातू

**अक्कलकाढा :** हे लहान वर्षायू , ३० ते ४० सेंमी. उंचीचे लहान झुडूप असते. झाडाची फुले खोकल्याच्या रोगावर पानाच्या विड्यातून देतात. अकलकाढा हा नाश करण्याकरिता होतो. दात दुखत असल्यास अक्कलकाढा व कोरांटीचा पाला एकत्र कुटून दाताखाली धरावा. आवाज मोकळा होण्यास व लाळ सुटण्यास मुळाचा तुकडा तोंडात धरावा. अकलकाढा अर्धांगवायू व मजातंतूच्या रोगात अत्यंत उपयोगी, उत्तेजक व बलदायक आहे. **अडुळसामुळे :** पाने, फुले व फळे यांचा औषधात वापर होतो. मुळ्या व पानांत वासिसीन नावाचे गुणद्रव्ये असून ते जंतुनाशक, कीटकनाशक आहे. अडुळसा, उत्तेजक, कफहारक, कफ पातळ करणारा, खोकला कमी करणारा, दमा, श्वास इत्यादींवर उपयुक्त आहे. क्षयरोग्यास फुलांचा कडेला लागवड करायला हवी. अनेक औषधी कंपन्या ओली किंवा सुकी पाने, साल घेऊ शकतात.

**आघाडा :** औषधांमध्ये आघाड्याचे पूर्ण पंचांग वापरतात. याच्या राखेत चुना, लोह, गंधक व मीठ ही घटकद्रव्ये असून वैद्यकीय द्रव्यात ही राख अग्रगण्य आहे. आघाडा कटू तीक्ष्ण, दीपक, आम्लतानाशक, स्वेदजनक, कपघ्न व पित्तसारक असून उंदराच्या विषावर, कुत्र्याच्या विषावर, विंचवाच्या दंशावर अशा विविध विषांवर गुणकारी आहे. रातांधळेपणावर सतत ३ दिवस संध्याकाळी भोजनानंतर १ तोळा मुळ्या खाण्यास देऊन झोपण्यास सांगावे. पोटदुखीवर आघाड्याची चार-पाच पाने चावून खावीत. **आंबेहळद :** ही हळद बागायती हळदीप्रमाणे मसाला म्हणून उपयोगात येत नाही. परंतु काही भागात याचे लोणचे घालतात . आंबेहळद रक्तविकारनाषक असून खरुज , मोच असल्यास , कोणत्याही आघाताने रक्त साकळलयास , जंत अशा विविध व्याधींसाठी तिचा वापर होतो. **अद्रक (आले) :** आले हे पाचक, सारक, अग्रेदीपक, रुचिप्रद व कंठास हितकारक असे आहे. सूज, कफ, वायू कंठरोगास खोकला, दमा, मलबद्ध, तांती, अरुची व शूल यांचा नाश करते. आले वाळलेली सुंठ सुगंधी व उष्ण असून तिच्या सेवनाने पचनक्रिया सुधारते व पोटातील वायूचा त्रास होत नाही. झोपताना सुंठेचे चूर्ण खाल्ल्यास आम्लपित्ताचा त्रास होत नाही. हळदीच्या पिकास उष्ण व कोरडे हवामानाची गरज असते. आल्याप्रमाणेच लागवड मे महिन्यात सरी-वरंब्यावर करतात. हळदीच्या प्रामुख्याने चांगल्या आहेत. हळद ही तिखट, कडू, उष्ण, रुक्ष असून कफ, वायू, रक्तदोष, कुष्ठ, कडू, प्रमेह, व्रण, सूज, पांडू, कृमी, विष, अरुची, पित्त यांचा नाश करते.

**लसून :** लसणाच्या सेवनाने अन्नपचन चांगले होऊन कोठा साफ राहतो. अजीर्ण, पोटदुखी, वात या विकारांवर लसूण पाकळ्या तुपात तळून खातात. घटसर्प, टी.बी., न्यूमोनिया या रोगांमध्येसुद्धा लसूण अत्यंत गुणकारी आहे. त्याचप्रमाणे त्वचारोग , लैगीक दुर्बलतेवरसुद्धा लसणाचा उपयोग होतो.कानदुखीत लसूण तेलात उकळून ते तेल सहन करू शकेल त्या तापमानात कानांत दोन ते तीन थेंब टाकतात.

**काळी मुसळी :** काळी मुसळी स्नेहक, मूत्रजनक, बल्य व काहीशी वृष्य आहे. हिची क्रिया विशेषकरून मूत्रमार्गावर होत असते. काळ्या मुसळीची पेज परमा, मूत्रकुच्छ या रोगांवर गुणकारी आहे. काळी मुसळी बाळंतपणातसुद्धा देण्याचा प्रघात आहे.

**गुडमार :** ही भरपूर फांद्या असणारे बहुवार्षिक वेल आहे. एप्रिल-मे महिन्यात येणारी फळे लांबट, उकलणारी, ७-८ सेंमी. लांबीची बियांवर लव असणारी असतात. अशा वेलीची लागवड बियांद्वारे किंवा छाट कलमांद्वारेसुद्धा केली जाते. या झाडाचे पान खाल्ल्याने हृदयाचे स्पंदन व लघवीचे प्रमाण वाढते. मधुमेहाच्या रोग्यांना २ ते ४ ग्रॅम वाळलेली पाने रोज खायला दिल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होते. याचा उपयोग यकृत टॉनिक म्हणूनसुद्धा होतो. काविळीवरील आयुर्वेदीय औषधामध्ये याचा वापर होतो. गर्भाशयाचे टॉनिक म्हणूनसुद्धा गुडमार उपयोगात आणतात. **गुळवेल :** औषधामध्ये कडूनिंबाच्या झाडावर चढलेली गुळवेल महत्वाची समजली जाते. तसेच गुळवेलीची काढणी जानेवारी-फेब्रुवारीदरम्यानच केली पाहिजे. गुळवेल उन्हाळ्यात पूर्णपणे पर्णविरहीत होते.खोडावरची साल पातळ असून सहज निघते. खोडास इजा केल्यास फिकट पिवळ्या रंगाचा स्राव येतो. गुळवेलीची पाने हृदयाच्या आकाराची, मोठी, चमकदार खोडावर एकाड एक असतात. फुले एप्रिल-मे महिन्यांत येत असून फळे औषधी उपयोगाचे असून ८-१० सेंमी. आकाराचे तुकडे करून ते उन्हात सुकविले जातात. लागवड करायची असल्यास खोड कलमाद्वारे निर्मिती करून नियोजित जागी लागवड करावी. गुळवेलीचे खोड चवीला कडू, होताना दिसून येतो. प्रामुख्याने जुलाब व हगवणीवर, पोटातील मुरडा, कृमी यांवर गुळवेल गुणकारी आहे.
त्याचप्रमाणे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठीसुद्धा तिचा उपयोग होतो. गुळवेल विशेषतः कावीळ रोगावर लाभदायी असून, त्वचारोग निवारण व लैंगिक शक्ती वाढविण्यासाठीसुद्धा उपयोग आहे.

**डिकमली :** डिकमली हे लहान, बहुवर्षायू झुडूप आहे. लहान फांद्यांवर येणारा चिकासारखा पदार्थ म्हणजे डिकमली होय. निभेळ डिकमल ओलसर व विकस प्रतिबंधक कोष्ठवात, कृमिघ्न, ज्वरनाशक आहे. हिवतापात कापरे भरल्यास डिकमलोने कमी होती. आतड्याच्या रोगात डिकमली दिल्यास वायू नाहीसा होतो. गोल आकाराचे जंत पडल्यास हे उत्तम औषध आहे. मुलांना दात येताना जुलाब, उलट्या या वर डिकमली गुणकारी आहे. छाटकमल , बियांद्वारे किंवा गुटीकलमांद्वारे लागवड करता येऊ शकते. **किडामार :** अनेक क्षार असणारी, अत्यंत कडू गुणकारी किडामार विविध औषधोपचारांत उपयोगात असून कष्टप्रद बाळंतपणात सुटका होण्यासाठी किडामारीचा रस किंवा चूर्ण देतात. गजकर्णावर पाने एरंडी तेलात वाटून लेप करतात. व्रणातील कृमीत मारण्यास व व्रण भरून येण्यास रस त्यावर लावतात. जनावरांच्या विषावर किडामारी पोटात देतात आणि दंशावर लेप लावतात . किडीमारांची वेल काळ्या जमिनीत तणासारखे येतात.
**ज्येष्ठमध :** ज्येष्ठमध हे बहुवर्षायू झुडूप असून पाने संयुक्त, फुले गुलाबीजांभळी, शेंगा चपट्या-मऊ, पण काटेरी असतात. ज्येष्ठमधाचे मूळ व जमिनीखालील खोड औषधात वापरतात. ज्येष्ठमध हे शीतल, स्नेहक, कफनाशक, मूत्रजनक व व्रणरोधक आहे. मुळे रेचक व कफ पातळ घसा खवखवत असल्यास मुळाचा तुकडा चघलण्यास देतात. त्रिदोषशामक असून कोणत्याही रोगावर त्याचा उपयोग होतो. म्हणून सर्व प्रकारच्या काढ्यांत हा वापरतात.

**माईनमुळा :** माईनमुळ्याचा उपयोग रक्तदाब, हृदयरोग, श्वास घेण्यास त्रास, हृदयक्रिया बंद पडणे व काही विशिष्ट प्रकारचा कॅन्सर इत्यादी व्याधींवर होतो. सर्वसाधारणपणे या वनस्पतीस १0 ते २५ अंश से. तापमान व ८३ ते ९५ टक्के आर्द्रता मानवते. परंतु, उष्ण हवामान व कमी प्रमाणात आर्द्रता असल्यास पाणी दिल्याने वनस्पतीची वाढ चांगली होते. लागवडीस निचरा होणारी, रेताड, गाळाच्या जमिनी चांगल्या असतात. लागवड ही खोडाच्या छाट कलमाद्वारे करतात. लागवडीनंतर साधारणपणे १४0 ते १५० दिवसांनी मुळे काढण्यास तयार होतात. हेक्टरी १५ किंटल ताज्या मुळ्यांचे उत्पादन होऊ शकते व मुळ्यांचा सरासरी दर ४0 रु. किलो.

**निर्गुडी :** सुजेवर निर्गुडीपाल्याचा शेक देतात. क्षयरोगात पंचांगांचा रस तुपाबरोबर दिल्यास गुण येतो. निर्गुडीच्या आणखी ३ प्रजाती असून साधारणतः सर्व प्रजातींचे गुणधर्म सारखेच आहेत. मुळापासून निघणाऱ्या फुटव्यापासून लागवड करता येते.

**सागरगोटी** : सागरगोटीला गजगा, केंजा, काटा, करंज या नावांनीसुद्धा ओळखतात. शेंगा लांबट गोल, चपट्या, काटेरी १ ते २ बिया असणा-या असतात. पाला व बिया औषधी उपयोगाच्या आहेत. ही उष्ण, रुक्ष, कटू रक्तस्राव बंद होण्यास, सुजेवर, कानदुखीवरसुद्धा सागरगोटीचा उपयोग होतो. सागरगोटी भाजून त्याचे वस्त्रगाळ चूर्ण करून त्यात त्याच्या १/४ हिस्सा पळसपापडी चूर्ण मिश्रण करून घेतल्यास कृमीवर गुणकारी होते. सागरगोटीची लागवड बियांद्वारे करतात. शेताला कुंपणासाठी सागरगोटीचा लागवड चांगल्या प्रकारे होऊ शकते. **तुळस :** तुळशीची पाने औषधी पानात ०.५ ते ०.७ टक्के तेल असते. तुळशीच्या तेलात युजेनॉल व लिनॅलुल ही प्रमुख गुणद्रव्ये आहेत. तुळशीच्या पानांचा उपयोग औषधाव्यतिरिक्त तेल निर्मिती करून विविध औषधी निर्माण करण्यासाठी होतो. तुळस रक्तशुद्धिकारक व हृदयबल असल्याने रक्तविकार व हृदल दुर्बलतेवर देतात. हिवताप, कफज्वर, गजकर्ण, खरूज या त्वचा रोगांवर तुळस गुणकारी आहे. मूत्रविकारात मूत्रल व पित्तनाशक म्हणून तुळशीचे बी वापरतात, तसेच तुळशीचा उपयोग उंदराच्या, मगरीच्या, विंचवाच्या व सपांच्या विषावरसुद्धा करतात. **वेखंड :** औषधासाठी वेखंडच्या कंदमुळाचा वापर होतो . वेखंड कफ ,पित्त व वात नाशक असल्याने सर्दी, पडसे, डोकेदुखी, संधिवात, आमवात, सूज, उल्टी, मूळव्याध, ताप इत्यादी विकारांवर उपयोगी आहे. वेखंडाच्या वाळलेल्या कंदाची भुकटी जंतू व कीटकनाशक असून धान्यातील किडी नियंत्रणासाठी त्याचा वापर होतो. वेखडाच्या वाळलेल्या कंदामध्ये १.५ ते ३.0 टक्के सुगंधी तेले, एकोरीन, ग्लुकोसाईड्स, युजिनॉल, एसारोन, कॅपीन इत्यादी गुणद्रव्ये असतात. वेखंडाच्या लागवडीसाठी समशीतोष्ण हवामान , भरपूर पाऊस, पाणथळ ,जमीन योग्य आहे. वेखंडाची लागवड वेखंड कंदाचे डोळेयुक्त तुकडे करून ३० बाय ३० सेंमी. अंतरावर सपाट कंद खोदून काढतात. कंद जमिनीखाली एकाच दिशेने ६० सेंमी.पर्यंत लांब वाढत असून, त्यावर तपकिरी रंगाचे आवरण असते. याची पाने ४५ ते ६0 सेंमी. लांब, उभार, गर्द हिरवी व चकचकीत दिसतात. कंदाप्रमाणेच यांनाही सुगंध असतो.

# धामणगाव येथे 75 नवउद्योजकांना 150 गायी वाटपाचे आयोजन

## आ. प्रशांत बंब यांची संकल्पना

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** गुरुवार, दि. 11 मे रोजी सकाळी 10.00 वाजता खुलताबाद तालुक्यातील धामणगांव येथील 75 नवउद्योजकांना 150 गायी वाटपाचे आयोजन केले असुन सदर कार्यक्रम ना.डॉ.भागवत कराड, केंद्रीय राज्यअर्थमंत्री, भारत सरकार, ना.अतुल सावे, सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, तसेच आ. हरीभाऊ नाना बागडे या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत राहणार आहेत. सतत दुष्काळाचा चटके सहन करणारा माझा मतदारसंघ म्हणून गंगापूर खुलताबाद मतदार संघाची देशात ओळख होती. 2012- 13 चा दाहक दुष्काळ असो किंवा 2017 - 18 चा दुष्काळ.... पावसाळ्यात थोडाफार पाऊस पडला तरी पडलेले पाणी वाहून जात होते, जलसंधारणाची अशी व्यवस्था नव्हती. पावसाळा संपल्यानंतर लगेचच पूर्ण मतदारसंघाला पिण्याचे पाणी देखील टँकरद्वारे पुरवावे लागत होते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी, मी दूरदृष्टीने मतदारसंघाला दुष्काळाच्या कचाट्यातून बाहेर काढण्यासाठी अटोकाट प्रयत्न सुरू केले.... तत्काळ उपयोगी येणारी कामे, काही काळानंतर उपयोगी ठरणारे कामे व दीर्घकाळासाठी उपयोगी ठरणारे कामे असा कामांचा क्रम ठरवत मतदारसंघाचे शिवार जलयुक्त करण्यासाठी ठाणगाट बांधली. शेकडो कोटी रुपयांच्या निधीतून जल संधारणाची कामे केली. यात नदी, नाले, ओढ्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरणाची कामे केली... यानंतर पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब मतदारसंघाच्या प्रत्येक शिवारात अडवला गेला आणि या सर्वांचे फलित म्हणजे मराठवाड्यात सर्वाधिक पाणीपातळी गंगापूर - खुलताबाद वाढली व मतदार संघातील शेती बहरली. मतदारसंघ टँकर मुक्त झाला आणि आता खरीपासोबतच रब्बी पिके ही शेतकरी बांधव घेत आहेत. गंगापूर-खुलताबाद मतदारसंघातील



जवळपास 1000 ( एक हजार ) तरुणांना दुग्ध व्यवसाय करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांच्या व्याजदरात काही दानशूर व्यक्तींच्या मदतीने सहज स्वरूपात आर्थिक मदत उपलब्ध करून देत आहेत. यातील पहिला टप्पा खुलताबाद तालुक्यातील 75 तरुणांना दुग्ध व्यवसायासाठी 150 गाई वाटपाचा कार्यक्रम दिनांक 11 मे 2023 गुरुवार रोजी सकाळी 10.00 वाजता, मौजे धामणगाव तालुका खुलताबाद येथे आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रम मा.ना.श्री. डॉ.भागवत कराड, साहेब, केंद्रीय राज्यअर्थमंत्री, भारत सरकार, मा.ना.श्री.अतुल सावे, सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, तसेच मा.आ.श्री.हरीभाऊ नाना बागडे, या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. यासोबतच मतदारसंघात पाणीटंचाई कायमस्वरूपी हटवण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड व गंगापूर उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातूनही योजनांना मंजूर मिळवली आहे. यामुळे आता गंगापूर खुलताबाद मतदार संघ हा दुष्काळाच्या खाईतून बाहेर काढण्याचे कार्य माझ्या स्वप्नपुर्तीकडे जाणारे आहे. भविष्यातही मतदारसंघातील गावां-गावांमध्ये 750 नवउद्योजकांना 1500 गायींचे दिवाळी वसुबारस पर्यंत वाटप करण्याची संकल्पना आहे. यामुळे नवउद्योजकांना स्वयंरोजगार उपलब्ध होऊन तरुणांना मोठा फायदा होणार आहे.

# आठवडी बाजारातून मोटरसायकलची चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील सोमवारी



भरणाऱ्या येथील आठवडे बाजारातून दोन मोटरसायकली चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे यामुळे आठवडी बाजारात येणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे वडोद बाजार येथे दर सोमवारी आठवडी बाजार भरतो या आठवडी बाजारात परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने येतात तर वाहनधारकांची मोठी गर्दी असते सोमवारी या आठवडी बाजारातून दोन मोटरसायकलची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली या चोरी प्रकरणी मोटासायकल मालकाने पोलिसांना माहिती तक्रार दिली आहे पोलीस या मोटरसायकल चोरीचा चोरी करणाऱ्यांना जेरबंद करावे अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे या चोरीच्या घटनेमुळे वडोद बाजार येथील आठवडी बाजारात येणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे हाकेच्या अंतरावर वडोद बाजार पोलीस ठाणे आहे. वडोद बाजार येथील सोमवारच्या आठवडे बाजारातून एम एच 20 डी 35 74 हिरो होंडाची मोटरसायकल तर एम एच 20 सी जे 1834 या दोन मोटरसायकलची आठवडी बाजारातून चोरी झाल्याची घटना घडली याप्रकरणी मोटरसायकल मालकांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली आहे मात्र पोलीस या मोटरसायकल चोरीचा तपास लावून चोरट्यांना जेरबंद करण्यात यावे अशी मागणी मोटरसायकलधारकांकडून होत आहे.

# बुद्ध हे क्रांतीचे प्रतीक : डॉ.दत्तात्रय जगताप

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** बुद्ध हे केवळ शांतीचे प्रतीक नव्हे तर ते क्रांतीचे सुद्धा प्रतिक आहेत असे विचार डॉ.दत्तात्रय जगताप यांनी मांडकी ( भीमनगर ) ता.पुरंदर येथे बुद्ध विहारात सर्वोत्तम भूमिपुत्र तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांची आयोजित करण्यात आलेल्या जयंती कार्यक्रमातून व्यक्त केले. ते "कुणबी मराठा राजपुत्र ते सर्वोत्तम भूमिपुत्र" या विषयावर ते बोलत असताना विचार मंथन करण्यात आले. यावेळी मांडकीच्या सरपंच प्रियांकाताई शिंदे, उपसरपंच बाळासाहेब जगताप, सदस्या दिपाली भोसले, सदस्य अतुल जगताप, पोलीस पाटील प्रवीण तात्या जगताप, माजी सरपंच सतीशनाना जगताप, माजी उपसरपंच विश्वास नाना जगताप, ॲड. राहुल शिंदे, भरत जगताप, सत्यजित जगताप, जयराज भोसले, बाळासाहेब धेंडे, गणेश भोसले, रमेश भोसले, विनोद धेंडे, निलेश भोसले, संतोष सोनवणे, विलास भोसले, मंगेश भोसले, सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे विशाल धेंडे, राहुल गायकवाड



यांच्यासह इतर उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत बुद्ध वंदना घेण्यात आली. गौतम बुद्धांना तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले.यावेळी नवबौध्द तरुण मंडळाच्या वतीने डॉ. दत्तात्रय जगताप यांना पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. तसेच सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्था ( महा. राज्य ) यांच्या वतीने सर्वांना संविधानाची उद्देशिका भेट देण्यात आली. पुस्तकातून वाचन संस्कृती आणि संविधान उद्देशिकातून संविधानाची जनजागृती करण्याचा विशेष प्रयत्न कार्यक्रमातून करण्यात आला. कुणबी मराठा राजपुत्र ते सर्वोत्तम भूमिपुत्र यावर विशेष संवाद घडून आला.त्याच प्रमाणे जगाला युद्धाची नव्हे तर समता-स्वातंत्र्य-बंधुता-न्यायाचा संदेश देणाऱ्या तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धांची गरज आहे, अनेक राजांनी बुद्धांचा विचार अंगीकारलेला असल्याचे सांगण्यात आले.एखादा विद्वान,सुंदर व्यक्ती सांगतोय म्हणून विश्वास ठेऊ नका,तर सत्याच्या कसोटीवर टिकणाऱ्या विचारावर विश्वास ठेवा आणि त्यासाठी तुम्ही स्वयंप्रकाशित व्हा. बुद्धांनी धार्मिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा सिद्धांत सांगितला.




# यशस्विनी महिला गट सहकारी पतसंस्थेस आर्थिक वर्ष २०२३ अखेर एक कोटी सतरा लाखांचा नफा

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हातील यशस्वीनी महिला गटाची सहकारी पतसंस्था छत्रपती संभाजीनगर या संस्थेला आर्थिक वर्ष २०२३ अखेर एक कोटी सतरा लाख रुपये नफा झाला आहे. ही संस्था १० वर्षापासून सभासदांना लाभांश देत आहे. याच प्रमाणे यावर्षी देखील संस्थेचे संचालक मंडळ व संस्थेच्या अध्यक्षा सविता देविदास अधाने यांनी सभासदांना १२ टक्के लाभांश देणे बाबतचा निर्णय घेतलेला आहे. संस्थेच्या संचालक मंडळांनी आर्थिक वर्षात खर्चात काटकसर करून संस्थेच्या सर्व शाखा ह्या नफ्यात चालू ठेवल्या आहेत.

संस्थेत दरवर्षी अधिकारी व कर्मचारी यांना टार्गेट दिले जाते, व टार्गेट नुसार वेतन वाढ निश्चित केली जाते. सहकारी संस्थेच्या माध्यमातून ठेवी व कर्जवाटप या व्यतिरिक्त बचत गट स्थापना, गटाचे मेळावे, चर्चासत्र, बैठका, थोर महान व्यक्तींचे जयंती, सहकार सप्ताह ही साजरा केला जातो. या माध्यमातून अधिकारी व कर्मचारी एकजुटीची भावना ठेवतात व ग्राहकांना संस्थेबद्दल आपुलकीचा विश्वास निर्माण करून देतात. तसेच सहकार चळवळ वाढ होण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांना अनेक माध्यमातून प्रसिध्दी देण्यात आली आहे. सर्वसामान्य महिलांनी सहकारातून जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व नियमाचे पालन केले तर सभासदाच्या विश्वासावर हे संस्थेला शक्य झाले, असे संस्थेच्या अध्यक्षा सविता अधाने यांनी कळविले आहे.

# नागनाथ जिंकले यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** अनंत बहुउद्देशीय सेवा संस्थेच अध्यक्ष



एस्. एच. बेग यांनी हा राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार धर्माबाद तालुक्यातील मनुर येथील सामाजिक कार्यकर्ते नागनाथ भिमराव जिंकले यांना जाहीर केला आहे. हा पुरस्कार १७ मे २०२३ रोजी प्रदान होणार आहे. नागनाथ भिमराव जिंकले यांचे धर्माबाद तालुक्यात येथे गेली १५ वर्षापासून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य असल्याने त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्यासारखा आहे तसेच जनजागृती पर उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून बुधवार दिनांक १७ मे २०२३ रोजी सकाळी ११ वाजता अहमदनगर येथील इंद्रायणी हॉटेल जवळील एन. आर. लॉन येथे त्यांना विविध राजकीय व सामाजीक मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे अशी माहिती रजत दायमा यांनी दिली आहे नागनाथ भिमराव जिंकले यांना यापुर्वी हि त्यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. समाज सेवक. तालुका स्तरीय समाज भुषण असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. संतोष बोलचेटवार मनुर सरपंच, विठल आष्टे सगंम सरपंच बामणी सरपंच शेषेराव पा.साखरे विळेगाव सरपंच उमाकांत पा.शिवशेटे, संघाचे अध्यक्ष जि.पी. मिसाळे, जेष्ठ पत्रकार सजंय कदम. पत्रकार संघाचे अध्यक्ष गंगाधर धडेकर, पत्रकार. माधव हानमंते, सुरेश घाळे, पत्रकार कृष्णा तिम्मापुरे, सुदर्शन वाघमारे, सिंहनाद युवक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनुपकुमार कासलीवाल. माजी नगर सेवक गंगाधर जारीकोटे.पोतन्ना लखमावाड, लक्ष्मण तुरेराव, लक्ष्मन पाटील येताळे. पोलीस युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष हनुमंत पाटील नरवाडे र्वणीनागभूषण निलेश पाटील बाळापूरकर बंडू पाटील नरवाडे गोविंद पाटील रोशन गावकर गोविंद पाटील सोनटक्के मारुती डेबेकर बिराप्पा मदनकर हिंदु युवा संघटनाचे, अध्यक्ष सतिश मोटकुल, प्रविण मदनुरे मोहन निरगटले बाबु जिंकले एकनाथ जिंकले यांनी दिल्या.





# सेक्युलर प्रोग्रेसिव्ह फ्रंट, महाराष्ट्र राज्य यांच्या पाचव्या ब्रँड ऑफ महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार २०२३ ने सी. ए. शंकर अंदानी सन्मानित

## शैक्षणिक व आर्थिक पुस्तकांनी ग्रंथतुला : निःस्वार्थ समाजसेवा व ज्ञानसेवा एक आदर्श व्यक्तिमत्त्व

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** येथील धम चारिटेबल ट्रस्ट व सेकुलर प्रोग्रेस्सिव फ्रंट या संस्थेतर्फे समाज कार्यात वाहून घेतलेल्या व धम विचार व प्रसार करणारे तसेच संपूर्ण जीवन निस्वार्थ पणे समाज गरीब व शोषित जनतेसाठी वाहिलेल्या एका व्यक्तीला ब्रँड आफ महाराष्ट्र, जीवन गौरव पुरस्कार व पूर्ण जीवन धाम प्रसार करणारे व्यक्ति अल धाम संगिनी जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतो.
२०२३ चे पाचवे ब्रँड आफ महाराष्ट्र, जीवन गौरव पुरस्कार जो समाजात अत्यंत मनाचा व प्रतीष्ठेचा साहित्य क्षेत्र व कला क्षेत्र अत्यंत उच्च असा पुरस्कार अहमदनगर येथील सि ए शंकर घन्शामदास अंदानी यांना जाहीर करण्यात आला होता.
रविवार दिनांक ०७/०५/२०२३ रोजी राजश्री शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे धाम विचारक माजी खासदार श्री जोगेंद्र कवाडे, मराठी चित्रपट अन्हीनेता श्री मिलिंद शिंदे, जेष्ठ विचारवंत श्री सुरेश वाघमारे, प्रा. किसनराव कुन्हाडे, बचाराम कांबळे, करुणा विमल. च्या पाटील, अनिल म्हमाणे व अनेक धाम विचारवंत यांचे उपस्थितील गुरु बुद्ध यांचे जयंती निमित एक दिवसीय सत्याशोदक धाम परिषद चे आयोजन करण्यात आले. सदर परिषदेमध्ये धम चारिटेबल ट्रस्ट व सेकुलर प्रोग्रेस्सिव फ्रंट या संस्थेतर्फे चे पाचवे ब्रँड ऑफ महाराष्ट्र, जीवन गौरव पुरस्कार २०२३ हा पुरस्कार अहमदनगर येथील प्रसिद्ध सनदी लेखापाल सि ए शंकर घन्शामदास अंदानी यांना प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार हे मानपत्र, रुपय दहा हजार रोख रुपये १५००० ची साहित्य पुस्तके, असे होते. सदर पुरस्कार मध्ये शंकर अंदानी यांची सामाजिक ग्रंथांनी ग्रंथ तुला करण्यात आली. सदर ग्रंथ तुलेतील अंदाजे रुपये एक लाख ची पुस्तके शंकर अंदानी यांनी गरीब व अनाथ मुळे यांचे शिक्षणासाठी दान केली. तसेच पुरस्कार राशी ही फिल्म क्लूब ला दान करून टाकली. त्यांच्या या मनाचे मोठेपणा व उदारतेचे सर्वत्र कौतुक झाले तसेच असे अत्यंत मोजके व्यक्तिमत्व देशात आहेत असे गौरव उद्गार अनेक प्रमुख पाहुणे यांनी केले. सिए शंकर अंदानी हे मागील अनेक वर्षा पासून समाज कार्य करीत आहेत तसेच त्यांचे कामकाज व्यवसाय हे अनेक मंदिर, धर्म शाळा, सामाजिक संस्था, चर्च, मस्जिद तसेच अनेक सामाजिक संस्था यांचे कामकाज अत्यंत अल्प दारात किंवा विना मूल्य करीत आहेत.
तसेच अनेक सामाजिक संस्था यांना योग्य ते मार्गदर्शन करून त्यांचे आर्थिक दप्तरे योग्य रित्या कसे ठेवावे, की की कागदपत्रे शाषकीय कार्यालयामध्ये सादर करावी, कर कसे भरावे हे समाज उपयोगी ज्ञान सेवा ते करीत आहेत. भारतातील सर्व स्थरातील उत्कर्ष कार्य व विक्रम करणे करिता सदर संस्था एका वर्षी फक्त एक व्यक्तींना त्यांचे कार्य व कामकाज यांची पूर्ण पणे छाननी व तपासणी करून जीवन गौरव पुरस्कार प्रदान करीत असते. अहमदनगर येथील सी ए ( DR ) शंकर घन्शामदास अंदानी यांना यापूर्वी युनायटेड नेशन अमेरिका, राष्ट्र अध्यक्ष कार्यालय अमेरिका या कार्यालयाचा मेडल ऑफ EXCELLENCE, उत्कृष कार्य नोंद, हा अत्यंत मनाचा सर्वोच आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच त्यांची इंडिया बुक आफ रेकार्ड व आशिया बुक आफ रेकार्ड तसेच एकूण ४१ जागतिक रेकॉर्ड मध्ये सी ए श्री शंकर अंदानी यांची नोंद झालेली आहे. यापूर्वी आज पर्यंत जवळ पास १५०० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कर मिळाले आहेत. सदर पुरस्कार करिता शिर्डी चे खा. सदाशिव लोखंडे अहमदनगरचे आ. अरुण काका जगताप, आ. संग्राम जि जगताप, पारनेरचे आ. निलेश लंके साहेब, आ. रोहित दादा पवार, माजी आ. विजय औटी साहेब, महापौर रोहिणी शेंडगे व महानगर पालिका आयुक्त श्री पंकज जावळे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी महापौर बाबा साहेब वाकळे, माजी महापौर कदम, शिवसेना शहर अध्यक्ष संभाजी कदम, माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, दत्ता कावरे, परेश लोखंडे, श्री संजय चोपडा, अहमदनगर सिधी समाज अध्यक्ष श्री महेश मध्यान तसेच अनेक सन्माननीय लोकांनी - सी ए श्री शंकर अंदानी यांचे अभिनंदन केले आहे.

# मंडळ अधिकाऱ्यास लाच घेताना पकडले; आरोपीवर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अशोक चिंघू गुजर, मंडळ अधिकारी, वाघाडी, ता. शिरपूर यांनी तक्रारदार यांचेकडे १०,००० /-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारताना त्यांना रंगेहाथ पकडले गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
तकारदार हे मौजे वकवाड, ता. शिरपूर येथील रहीवाशी असून त्यांची मौले वकवाड येथे वडीलोपार्जित शेत जमिन आहे . सदर शेत जमिनीमध्ये विहीर नसतांना ७/१२ उता - यावर चुकीने विहिर असल्याची नोंद झालेली असल्याने तक्रारदार यांना सदर शेत जमिनीत विहिरी साठी शासकीय अनुदान मंजूर होण्यासाठी अर्ज करता येत नव्हता. त्यामुळे त्यांनी ७/१२ उता - या वरील चुकीने झालेली विहीरीची नोंद कमी करण्यासाठी तलाठी वकवाड यांच्याकडे अर्ज केला असता तलाठी वकवाड यांनी सुमारे ५ महिन्यांपूर्वी विहिरीची नोंद कमी करण्यासाठी फेरफार



नोंद घेतलेली आहे सदरची नोंद ही मंडळ अधिकारी यांनी मंजूर केल्याशिवाय विहिरीची नोंद कमी होत नसल्याने तकारदार यांनी वेळो - वेळी मंडळ अधिकारी श्री अशोक गुजर यांना भेटुन त्यांना विहीरीची नोंद कमी करणेबाबतची फेरफार नोंद मंजूर करणे बाबत विनंती केली असता , मंडळ अधिकारी अशोक गुजर यांनी तक्रारदार यांना त्यांचे शेत जमिनी संदर्भात यापूर्वी केलेल्या हक्कसोडच्या कामाचे बक्षीस म्हणून तसेच ७/१२ उताऱ्यावर चुकून झालेल्या विहीरीची नोंद कमी करण्याबाबतची फेरफार नोंद मंजुर करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १५,००० / - रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी दि .०८.०५.२०२३ रोजी धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दुरध्वनी व्दारे माहीती दिली होती . सदर माहितीवरुन धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शिरपूर येथे जाऊन तक्रारदार यांची भेट घेऊन त्यांची तक्रार नोंदवून सदर तकारीची दि . ०८/०५/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान मंडळ अधिकारी अशोक गुजर यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे शेत जमिनी संदर्भात यापूर्वी केलेल्या हक्कसोड कामाचे बक्षीस म्हणून तसेच ७/१२ उता - या वरील विहीरीची चुकीने झालेली नोंद कमी होणेबाबतची फेरफार नोंद मंजूर करण्यासाठी तडजोडी अंती १०,००० / - रु पंचासमक्ष मागणी करून सदर लाचेची रक्कम त्यांचे शिरपूर येथील मिलींद नगर मधील राहते घरी घेवुन येण्यास सांगितले होते . आज दि .० ९ / ०५ / २०२३ रोजी मंडळ अधिकारी अशोक गुजर यांच्या शिरपुर येथील राहते घरी सापळा लावला असता मंडळ अधिकारी अशोक गुजर यांनी यांच्याकडून १०,००० / - रुपये लाच स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १ ९ ८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे . तक्रारदार सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक धुळे विभागाचे पोलीस उपअधीक्षक अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मंजितसिंग चव्हाण, तसेच राजन कदम, शरद काटके, संतोष पावरा , रामदास बारेला , भुषण खलाणेकर , गायत्री पाटील मकरंद पाटील, प्रवीण पाटील , रोहीणी पवार, सुधीर मोरे, जगदीश बडगुजर यांनी केली आहे. सदर कारवाईस नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा घारगे वालावलकर , अपर पोलीस अधीक्षक नारायण न्याहाळदे व वाचक पोलीस अधीक्षक नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शन लाभले आहे . सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर